म. ग्रं. सं. ठाणें
विषय का...
सं. नं. ९८४

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.

# कुलीन स्त्रियांकरितां सुबोध गाणीं.

## भाग पहिला.



किंमत चार आणे.

श्री

# कुलिन स्त्रियांकरितां सुबोध गाणीं.

## भाग १ ला.

हीं गाणीं

केवळ कुलीन स्त्रियांच्या उपयोगाकरितां

एका

आर्यभगिनीनें तयार केलीं

तीं

बडोदें येथें "पूर्णचंद्रोदय" छापखान्यांत छापिलीं.

सन १८९७.

किंमत चार आणे.

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क स्वाधीन ठेवले आहेत.

# प्रस्तावना.

वैधव्य दशेंतील दुःखद काल सुखांत घालविण्यास ईश्वरभजनावांचून दुसरा मार्ग नाहीं. चार आयाबायांत बसून संसारांतील कर्मकथा ऐकत किंवा सांगत बसण्यापेक्षां, देवाधर्माचीं पुस्तकें वाचणें, त्याचीं गुणानुवादाचीं गाणीं ऐकण्यांत आल्यास तीं लिहून घेणें व माझ्या वडीलांनीं बालपणीं मला जें विद्यादान दिलें त्या आधारें ईशस्तुतीपर अशीं कांहीं गाणीं रचणें, हा व्यासंग आज बरेच दिवसांपासून लागल्यामुळें मजजवळ अशा गाण्यांचा संग्रह पुष्कळ झाला आहे. त्याचा लाभ माझ्या आर्यभगिनींस व्हावा ह्मणून मीं हा पहिला भाग छापविला आहे. ह्यास योग्य आश्रय मिळाल्यास पुढील भागही छापून प्रसिद्ध करण्याची उमेद येईल.

मी स्वतः फारशी शिकलेली नसल्यामुळें व पुस्तक प्रसिद्ध करण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें ह्यांत बऱ्याच चुका राहिल्या असतील. त्याबद्दल माझ्या आर्यभगिनी मला क्षमा करितील आणि ह्या पुस्तकांतील गुणांचा हंसक्षीर न्यायानें स्वीकार करतील अशी आशा बाळगतें.

यमुना.

श्लोक.

माता रामो मत्पिता रामचंद्रः ॥
स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ॥
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालु ॥
नान्यं ज्जाने नैव जाने न जाने ॥

( राममंत्र. )

श्रीगजाननप्रसन्न.

# कुलिनस्त्रियांकरितां सुबोध गाणीं

# भाग १ ला.

## ॥ पद ॥

चाल—( मजबहुतचहीं आशा होती वहीनी. )

श्री सिद्धिविनायका गौरीसुता गणराया ॥ यमुना लागतसे तव पाया ॥ मज द्यावि मती श्रीहरि गुण वर्णाया ॥ सरस्वती तव जाया ॥ चाल ॥ येई येई ब्रह्मसुते हो ॥ येई येई ब्रह्मसुते ॥ तव चरणीं लागते मातेग ॥ तव आनंदे विनवीते तुतेग ॥ आनंदे विनवीते तुते ॥ चाल ॥ रिद्धीसिद्धी ह्या अखंड तुझेपाशी ॥ विचरिती होऊनिया दासी ॥ मग नमिते हो नमिते सद्गुरुनाथा ॥ वरदहस्त ठेवि ममनाथा ॥ गित गाइन हो गाइन श्री रघुनाथा ॥ विनवी त्या आनंता ॥ चाल ॥ मग नमिते माता पिता हो माता पिता ॥ आणीक साधूसंता ॥ श्रीस्वामी कृष्णनाथा ॥ चाल ॥

तुजवांचुनरे नाहीं कुणाची आशा ॥ यश देई श्री जगदीशा ॥ १ ॥

## सद्गुरूची पूजा.

चाल—( सुगुणचरित्रें. )

सद्गुरुपुजनीं इच्छा झाली माझीये मना ॥ दयाळा माझीये मना ॥ आले हो महाराज पूर्ण झाली कामना ॥ नवविध रत्नांकित चौकी त्यावर बसले गुरुराया ॥ त्यावर बसले गुरुराया ॥ कामादिक षड्रिपू वर्जी धासित गुरुपाया ॥ नानापरिचें तैल सुगंधिक आणविली माया ॥ श्रीगुरुला आणविली माया ॥ प्रेमसुगंधिक बुक्का उटणें लाविते गुरुपाया ॥ निर्मळ घंगाळीं गंगाजळ उष्ण उष्ण पाणी ॥ श्रीगुरुला उष्ण उष्ण पाणी ॥ सलोकतादि मुक्ती नाहाणिती चौघी सुवासिणी ॥ १ ॥ पितांबर जरीकांठि नेसले पाहूं चला नयनीं ॥ श्रीगुरुला पाहूं चला नयनीं ॥ जडावाच्या खडावा श्रीगुरु घालीतसे चरणीं ॥ चौसन्याचें सिंहासन मीं निजहस्तें केलें ॥ श्रीगुरुला० ॥ सज्जन घनरूप वरद प्रतापी सद्गुरु वर बसले ॥ केशरी मृगमद गंध अक्षदा भव्य रूप दिसलें ॥

श्रीगुरुचें भव्य रूप दिसलें ॥ नानापरिचीं पुष्पें सुगंधिक तुळशीहार समर्पिले ॥ अज्ञानाचा धूप जाळिला त्रिगुण दीपजोती ॥ जाळिला० ॥ षडविधि अन्नें नैवेद्य गुरु भक्षण करिती ॥ त्रयोदशगुणी विडा करुनि मी सद्गुरुला देते ॥ करुनि मी सद्गुरुला देते ॥ तन मन धन दक्षणा गुरुचे पदीं समर्पीते ॥ सर्व मंडळी उभी राहिली आरती करायाला ॥ श्रीगुरुला० ॥ पुष्पांजळी मी अर्पण करिते श्रीगुरुरायाला ॥ नमन साष्टांग नमन मी करिते श्रीगुरुचे पाया ॥ करिते श्रीगुरुचे पाया ॥ सज्जन दास किंकर गेले सुखे निजठाया ॥ २ ॥

## धांवा दत्ताचा.

चाल—( सदर. )

श्रीविधि हरिहर मूर्ति सांवळी कृष्णातिरि राहे ॥ सांवळी० ॥ दत्तदिगांबर ह्मणति जयाला औदुंबर छाये ॥ धृ० ॥ कृष्णातिरिचा आगाध महिमा दुर्लभ देवासी ॥ महिमा० ॥ जिच्या तिरीं वास जयाचा अखंड हो काशी ॥ प्रातःकाळीं सुरगणमुनिजन येती स्नानासी ॥ मुनिजन० ॥ पवित्र होउनि शुद्ध

भक्तिनें साधिति मुक्तीसी ॥ महापातकी करितां स्नानें जातात मोक्षासी ॥ स्नानें० ॥ चला जाउ या करा तयारी सत्वर लवलाहे ॥ दत्तदिगांबर ह्मणति० ॥ १ ॥ ध्यान पाहतां भगवीं वस्त्रें परिकर लंगोटी ॥ वस्त्रें० ॥ सर्वांगीं चर्चुनी बैसले भस्माची ऊटी ॥ दंड कमंडलु हातीं घेउनि उपवस्त्रें छाटी ॥ घेउनी ॥ रुद्राक्षाचे हार प्रफुल्लित शोभति बहु कंठीं ॥ शमीपत्र बिल्वदल तुळशी सुमनाची दाटी ॥ तुळशी० ॥ प्रेमानंदे भक्त वाहती आवडि बहु मोठी ॥ हास्य मुखानें कृपाकटाक्षें दासाकडे पाहे ॥ गुरू हा दासाकडे पाहे ॥ दत्तदिगांबर० ॥ २ ॥ औदुंबराची सेवा करितां कोटी पापाची ॥ करितां० ॥ राखरांगोळी होउनि जाते साक्ष आंबेची ॥ ऐशा वृक्षा तळीं बैसली स्वारी श्रीगुरुची ॥ बैसली० ॥ तीन त्रिकाळीं पूजा होते श्री गुरुरायाची ॥ सायंकाळीं असें वाटतें शोभा स्वर्गीची ॥ वाटते० ॥ मंत्रपुष्प अति घोष गर्जना चर्चा वेदाची ॥ तेव्हां सीताराम पाहुनी आनंद न समाये ॥ हृदयीं० ॥ दत्त दिगांबर० ॥ ३ ॥

## गिरिजारमण.

चाल—( नको निशिमध्यें बाहेर जाऊं. )

व्याघ्रकडासन मृगचर्मांबर वासुकि कंठीं भूषणरे ॥ जटा पिंगळ्यां भस्मांगित धारणयोगि दिसे बहु मोठारे ॥ या भवनदितुनि पार करी मज दयानिधे गिरिजारमणारे ॥ याभवनदि० ॥ १ ॥ लंकानाथें शामगायनें प्रसन्न केलें तुजलारे ॥ आत्मलिंग हें काढुनि दिधलें ऐसा शंकर भोळारे ॥ याभव० ॥२॥ शिवशिव ऐसें त्रिवार वाचे दोष हरिति या नराचे॥ ऐसें नाम पतितपावन सद्गुरूकृपें हाचिरे ॥याभव०॥ ॥ ३ ॥ त्रिशूल डमरू आयुध शोभती आणिक गिरिजा गणपतिरे ॥ जटा जटेंतुनि गंगा वाहे भाळीं चंद्र अर्धारे ॥ ४ ॥ याभ० ॥

## धांवा द्रौपदीचा.

चाल—( सदर. )

द्रौपदी बहीण ह्मणे कृष्णाशी तेव्हां मीं वदलें शिवनेशी ॥ दुःशासन हा धरितो केशीं ॥ पहा मज उभी केलि सभेशी ॥ धांव गंगेवा तूं तुळशी ॥ शरण

मी पदारविंदासी धांव गंगे ॥ धृ० ॥ १ ॥ कृष्णा ह्मणते धरू नको वेणी ॥ भुजंग जाणावा नयनीं ॥ पार्थचि माझा पाहिल नयनीं ॥ तो तुज नेइल यमसदनीं ॥ धांव गंगे० ॥ २ ॥ कर्ण ह्मणे तुह्मी ऐका वहिनी ॥ सुयोधनाचीं गान्धार्णी ॥ संतत संपत ज्याचे सदनीं ॥ सुख भोगिशि तूं मृगनयनी ॥ धांव गंगे० ॥ ३ ॥ शिवशिव ऐसे ऐकुनि कानीं ॥ कशिरे वदली तुझि वाणी ॥ कळपांतुनि मज काढुनि हरिणी ॥ मूर्च्छित पडले मी धरणीं ॥ धांव गंगे०॥ ॥ ४ ॥ धर्महि माझा सत्यवचनें अंकित आहे अर्जुन ॥ भिमसेनाची गदा तुं जाण ॥ व्यर्थचि देशिल हा प्राण ॥ धांव गंगे० ॥५॥ पांचाळी ह्मणे पतिव्रता ॥ संकटिं पडलें भगवंता ॥ धांवा ऐकुनि द्वारकानाथा ॥ ये धांवत गरुडावरती ॥ धांव गंगे० ॥६॥ लक्ष्मी पुसते मधसुदनासी ॥ काय वाटते जिवाशी ॥ सदा सर्वदा चित्त उदाशी ॥ कां बोलाना तुह्मि मजशीं ॥ धांव गंगे०॥७॥ नारायण ह्मणे ऐक सुंदरी ॥ कौरव पांडवाचे वैरी ॥ भक्तांघरिं माझे झाली चोरी ॥ ह्मणून माझे ते वैरी ॥ धांव गंगे० ॥८॥ दुःशासन

री. क्र.।०४ ...



गांजितो सतीला ॥ कोण नेआवितो तुजला ॥ विश्वंभर हा पावेल मजला ॥ आग्नि लागो तुझ्या वदनाला ॥ धांव गंगे ॥ ९ ॥ दुःशासन पुसतो मदसुदनासी ॥ काय वाटतें तुझे मनासी ॥ नेउनि ठेवा ह्मणतो कपटी ॥ ममता नाहीं साचे हृदयासी ॥ धांव गंगे० ॥१०॥ त्या दुष्टाची ऐकुनि वाणी ॥ संतप्त झाले चक्रपाणी ॥ एकही वस्त्र न दिसे धरणी ॥ कोणा न कळे त्याची करणी ॥ धांव गंगे० ॥ ११ ॥ करुणावाणी ऐकुनि कानीं ॥ हरि धावोनीया आला ॥ वस्त्रें पुरवीलीं त्याहि सतीला ॥ आपुला पितांबर नेसविला ॥ धांग गंगे० ॥ १२ ॥

## श्रीरामसुताचा संवाद.

चाल—( वृक्षवटीका. )

ह्मणे जानकी नाथशिशूहो सांगा तुमचा पिता ॥
जननी नाम कुळ गोत्र तत्वता ॥ अहा ऋषीचे
शिष्य पुत्रकीं एकोदर उभयतां ॥ तुह्माला कोण
गुरू शिकवीता ॥ चाल ॥ देतसे राज्य हें तुह्मा हो ॥
देतसे० ॥ मागावें अपेक्षित आह्माहो ॥ मागावें० ॥

यावरी समरीं न श्रमाहें ॥ यावरी० ॥ चाल ॥
वैमुनिया निज रथीं चलावें सदनीं मम बालका ॥
ऐकतां सुख उपजेल भाविका ॥ वर्णावा किति
जानकी तनय संवाद धरिसि कां निका ॥ऐकतां०॥
॥ धृ० ॥ १ ॥ देती उत्तर आह्मा नसे मनीं विभ-
वाची वासना ॥ पुरवुं आह्मी तुझिचरे मन कामना ॥
भोगी ही संपत्ति तुझी तूं नरेंद्र अमरेंद्र दिना ॥
सजली निरान्यायें विमलांगना ॥ दारासुत विरहीत
आवडलें राज्य कसेंरे मना ॥ आतां करी समरिं
आम्हा सामना ॥ चाल ॥ राहिली कीर्ति आजवरी
हो ॥ राहिली० ॥ आम्हि नव्हतो जों भूवरि हो
॥ आम्हीं० ॥ निज गर्व सर्व आवरि हो ॥ निज० ॥
॥ चाल ॥ जिंकुनि गज, रथ, तुरग समरीं गाजवु
आपुला शिका ॥ ऐकतां सुख० ॥ २ ॥ ऐकुनि
उपहासास्पद वाणी नाणि मनीं रघुपती ॥ होय
संतोष दावी विभवा प्रती ॥ निरखुनि ऐसे नवल
वदति ते राघवासि सुतपती ॥ निमाली अशी वी-
रका मती ॥ कळि काळांतक हे भुज असतां या
समयीं कांपती ॥ आतां आम्ही. काय करावी गती

॥ चाल ॥ ह्मणे राम नाम हें करा हो ॥ ह्मणे० ॥ मज मारवेना लेंकरां हो ॥ मज० ॥ घेऊनी आपेश हें करा हो ॥ घेऊनी० ॥ चाल ॥ ऐकुनि मति विभव तनय सर्वही पिटिती करतालिका ॥ ऐकतां॥ ॥ ३ ॥ पुससी सोडुनि युद्ध आम्हां कुल ऐक सांगतो तुला ॥ असे रविवंश अनुप आपुला ॥ सुर सरिता सम जननि जानकी उदरीं जन्म घेतला ॥ सूड घ्यावया धरून हेतुला ॥ गमला तुज निजपराक्रम बांधुनि उदधीवर सेतुला ॥ मारिलें वालिशवर मातुला ॥ चाल ॥ हें घडे शक्तिचें बळें हो ॥ हें घडे०॥ असें वदति आवळे जावळे ॥ हो असें० ॥ तों अधि दिवस मावळे हो ॥ तों अधि० ॥ चाल ॥ काढुनि आपली समूळ विद्या तुमचे तुळणीं तुका ॥ वंदु मग दास होउनी पादुका ॥ वर्णावा० ॥ ऐकतां ॥ ४ ॥

## लक्ष्मीकांत.

चाल—( सदर. )

॥ कांहो लक्ष्मीकांता प्रभुजी निद्रा आली कशी ॥ मजविषयीं दयाळा अंत किती पाहशी ॥धृ०॥ चिंता-

नदींत बुडतों या भवपुरीं ।। मारितो हाका हरि मज धरीं ।। कल्पनेचा भवरा हा मज नेतो खालीं वरी।। कासे लाउनि पार उतरी ।। जिव तळमळतो फार कुरवाळुनि धरि मजला पोटासी ।। मजवि०।। कांहो लक्ष्मी० ।। १ ।। ध्रुव बाळक अज्ञान वनीं मारितो हाका जाऊनि ।। अढळपदीं बैसविला नेउनि ।। सभेमाजी उभी द्रौपदी म्लान वदन करुनी ।। पूर्विशी वस्त्रें स्वयें येउनी ।। संकटीं घालुनी उडी तारिलें त्वां आजामेळासी ।। मज० ।। कांहो ।। २ ।। माझ्या वेळे तुमच्या कैशा शक्ती झाल्या हिन ।। चोरि हे गेलें सुदर्शन ।। कल्पतरू हा झुकला त्याचीं गळुन गेलीं पानें ।। आटली कामधेनुचीं स्तनें ।। क्षीरसिंधु हा कोरडा पडला गत झाली कैशी ।। मज० ।। कांहो।। ।। ३ ।। वितभर पोटासाठीं आम्हासी दारोदार लाविलें ।। ब्रिदावरता शून्य घातिलें ।। तुझेंच होईल हंसे, लोकिं आमचें काय गेलें ।। ऐकतां हसे नरहरिला आलें ।। आतां ठाव दे महिपती ह्मणे आपुले चरणापाशीं ।। मज० ।। कांहो ।। ४ ।।

# इंदुवदन.

चाल—( सुंदरमुख तुंदिलतनु नंदिकेश्वरा. )

॥ इंदुवदन कुंदरदन नंदनंदना ॥ गिरिधर शशि-अनुजावर अमरवंदना ॥ इंदुवदन० ॥धृ॥ मंदस्मित चारुहस्य विलससुंदरा ॥ कटितटिपित हटकतप्त राजितांवरा ॥ रंजवि रमसुख करधृत वेणुरांधरा ॥ ॥चा० दु०॥ चरणीं, रमणी, तरुणी; बृजसुखिला, रतिविकला; कृतविपुला, सुरतमंजना ॥ इंदुवदन॥१॥ हल्लकनव पल्लवदल सुभगलोचना ॥वल्लवकुल वल्लभ-अरि मल्लकंदना ॥ मर्दिततनु विमलशाम मलय-चंदना ॥ सदया, कृपया, उदया; निजभजनीं, करि-स्वजनीं, भवशमनीं, अघविनिर्शना, ॥ इंदुवदन ॥ ॥ २ ॥ माया मोह जाज्वल्ल न विकटसंश्रुती ॥ होउं कसा पाशमुक्त नेणवे गती ॥ जगन्नाथ निज अनाथ द्यावि सन्मती ॥ धांवे, पावे, द्यावें; सुखचरणा, करि-करुणा, हरिभरणा, न करि वंचना ॥ इंदुवदन ॥ गिरिधर ॥ ३ ॥

## उखा.

चाल–( नाहीं झाले शण्मास मला. )

॥ निशि रमुनी प्रिय गेले मला विरह लावुनी ॥ उखा सांगे निजस्वप्न चित्ररेखे लागुनी ॥ निशि०॥ ॥धृ०॥ मी जागृत वा भ्रमित काय उमग हा नसे ॥ जनीं स्वप्नीं ना पुरुषलेप मानसीं वसे ॥ ही विपरित गती काय योग्य यामिनी असें ॥ नवल वाटतें मनीं ॥ निशि० ॥१॥ मधुमास कुसुम सुखद परम अधि-पराजसी ॥ वैशाख शुक्ल सुदिन पुण्यद्वादशीनिशीं ॥ हा तरिच लाभ विभव लग्न सुरतसंरसीं ॥ वरचिमु-द्धिनी० ॥ निशि० ॥ २ ॥ जो जिवलग ममप्राण गर्भतेज पूतळा ॥ जो मन्मथहिन वदनिं भास चंद्रमा कळा ॥ तें विमलभाग्य जनकजननि प्रसव सूशिला॥ दैवहीन मी जनीं ॥ निशि० ॥३॥ ऐक प्रिये शांत-चित्तें विरह आवरुनी ॥ मज नारद दयें सकळ ज्ञान चित्रलेखनीं ॥ तरि दावी बरें लिहुनि सर्व श्रुनित भूवनीं ॥ पाहे निरखुनी ॥ निशि० ॥४॥ हें बोलुनि करि चित्ररेखि चित्रलेखना ॥ जें सुंदर नृपकुमर

रम्य रंजवी मना ॥ प्रिये पाहे यदुवंश कृष्णतनय नंदना ॥ ओळखी मनीं० ॥ निशि०॥ ५ ॥ उखा पाहे जव कृष्णरूप शंकली जरा ॥ तत्कुमर मदन श्वशुर भास वागला पुरा ॥ पुढें पाहे अनिरुद्ध कांत ओळखी वरा ॥ गमत हा मनीं० ॥ निशि०॥ ६ ॥ हें जाणुनि गुज चित्ररेखा गुप्त साधनीं ॥ अनिरुद्ध आणि मोहुनि त्वरित द्वारकेहुनी ॥ करि उभय ऐक्यरति निमग्न तोषली मनीं ॥ जगन्नाथ गात सूजनीं ॥ निशि रमुनी प्रिय गेले० ॥ ७ ॥

## रुक्मिणीस्वयंवर.

चाल—( लग्नाला जातो मी. )

॥ वरिलें निज प्रेमें तुला येई यदुविरा ॥ देतो मम अनुज मला चैद्य नृपवरा ॥ वरिलें० ॥धृ० ॥ लग्न-समय समिप तरी ॥ येइ त्वरित मज तूं वरी ॥ तत्पर शिशुपाल परी ॥ नच मन्मन त्यासि वरी ॥ प्राणहरिन नवरी ॥ नवरि त्या वरा ॥ वरि० ॥१॥ लिखितार्थी हाच भाव ॥ धरिली तव चरणीं हाव ॥ यास्तव तो द्विज सुदेव ॥ प्रेपितसे करि ही कीव ॥

करुणाकरि त्वरित धांव ॥ पाव श्रीधरा॥वरि०॥२॥ लग्ना अधि हाचिं नेम ॥ पुजित अंबिकेसि सुरम ॥ तीच संधि धरुनि सुगम ॥ येउनि हरि मज तूं परम ॥ चैद्यादिक मुनि अधम ॥ ग्रहण करि करा ॥ वरिलें ॥३॥ विनय भावि सदय हरी ॥ येई कौंडिण्यपुरीं ॥ घेई रथीं वधु ती करी ॥ आलिंगुनि हृदयीं धरी ॥ पाहुनि मनीं खवळधिरीं ॥ ऊठला पुरा ॥ वरिलें ॥ ४ ॥ हारुनि चैद्य मागधासि ॥ विटंबुनि अग्रजासि ॥ रुक्मिणि वरि संभ्रमेसि ॥ सौख्य सकल सुरनरासि ॥ जगन्नाथ स्मरि मनासि ॥ साच वधुवरा ॥ वरि० ॥ ५ ॥

## संसार.

चाल—( जिकडे तिकडे कालि मातला. )

॥ हा संसार मिथ्या भारी शाश्वत याचें धरूं नये । कोणी कोणाचें नाहीं रे सखया व्यर्थ भ्रमामध्यें भुलूं नये ॥ कोणाचि माता कोणाचा पिता जरि हें आपुलें ह्मणूं नये ॥ कोणाचे बंधू कोणाच्या बहिणी ॥ अंति कामा कोणी नये ॥ कोणी कोणाचा गुरु

नाहीं शिष्या लटकिच भीती धरूं नये ॥ परलो-
कीचें साधन हरिचें नामस्मरण विसरु नये ॥ जसें
करावें तसें भोगानें शब्द कोणावर ठेवुं नये ॥ पर
लोकीचें० ॥ धृ० ॥ १ ॥ आम्हीं एक ज्ञान वरिष्ट
ऐसी मनीं अहंता धरूं नये ॥ लीनपणें सर्वांसि
असावें गर्व फारसा करूं नये ॥ पुराण श्रवणा
हरी कीर्तना कोणा संगती जाऊं नये ॥ गेले तरी
प्रपंच गोष्टी व्यवहाराच्या करूं नये ॥ रामनाम कर
टाळि वाजवी लाज सख्यांनो धरूं नये ॥ समर्थ
झाला दुर्बळ म्हणुनि ॥ अनाथासी छळूं नये ॥ पर
लोकीचें० ॥ २ ॥ दो दिवसाचें वैभव आलें ह्मणून
उन्मत्त होऊं नये ॥ मनामध्यें कपट ठेवुनी वर भोळे
भक्तिसी दाउ नये ॥ मुखावराति स्तुति करोनी वर
निंदक शब्द बोलुं नये ॥ आधी दृष्टिनीं पहावें, नाहीं
तर घर कोणाचे घेऊं नये ॥ परबुद्धीसी लागुनि उगाच
दोष कुणावर ठेवुं नये ॥ जसा जो ज्याची कर्मे
करिल तसा तों भरील विस्मय चित्तीं धरूं नये ॥पर०॥
॥ ३ ॥ ज्याचे घरीं संतनिंदा तें घर ऐसें ह्मणूं नये ॥
संताचा जो द्रोह करिल तो नर खर जाणावा शिवूं

नये ॥ संताचें जो वचन न मानी त्याचें तोंड कदापि पाहुं नये ॥ नरहरि सांगे महीपतिलागी खळवाद्यासी भांडु नये ॥ वचन आपुलें न मानि तरी सांगतां हो चुकूं नये ॥ परलोकीचें ॥ ४ ॥

## गोरा राम.

चाल—( वृक्षवटीका झाडें पुर्ण्पें. )

॥ पूर्व पश्चिम द्वारीं येतां पाहिली अयोध्या जशी ॥ वाघ गजराशी कर्ण दीधले नेत्राची गति कशी ॥ चित्रविचित्रे वहुत काढिलीं भारत गेल्या जशी ॥ पाहुनि मन हें चकित झालें आले गणपतिशी ॥ ॥ चाल ॥ चरणीं ठेवितें माथा ॥ हो चरणीं० ॥ मज रक्षि सांभाच्या सुता ॥ हो मज० ॥ प्राणसखा भेटवि आतां ॥ प्राण० ॥ चाल ॥ प्रभूचें चरणीं लीन मी झाले हेतु माझा राहिला ॥ काम, क्रोध, हे त्यजुनि दाखवी कौसल्येच्या मुला ॥ काय सांगू नवल आज मी गोरा राम पाहिला ॥ लक्ष्मण सीते सहित माझे हृदयामध्यें राहिला ॥ १ ॥धृ०॥ गणपतीचें दर्शन घेउनि रामदूत पाहिला ॥ सर्वकाळ

तो हात जोडुनी पुढें उभा राहिला ॥ अंजनीसुता श्रीहनुमंता शरण मी आलें तुला ॥ अनन्यभावें तुझिया चरणावरि माथा ठेविला ॥ चाल ॥ पुराणाचा थाट हा कसा हो ॥ पुरा० ॥ श्रोत्यांचा समुदाय जसा हो ॥० श्रोत्यां० ॥ महिमा वैकुंठीचा तसा हो ॥ महि० ॥चाल॥ सिंहासनवर राम लक्ष्मण ॥ जनकाची वेल्हाळा ॥ पाहुनि मन हें शांत झालें डोळे भरुनि न्याहाळा ॥ कायसा० ॥ मंडपी दाटी पाहुनी देवी नमिली अष्टही भुजा ॥ तेथुनि पुढें येतां देखिला कैलासिचा राजा ॥ वामांकीं पार्वती शोभते सुंदर शैलात्मजा॥हास्य वदन हें दोघे पाहती पुढें नंदिची मजा ॥ चाल ॥ शिर ठेवितो चरणावर हो ॥ शिर० ॥ कृपादृष्टी पाहे सत्वर हो ॥ कृपा०॥ मज दाखवि श्री रघुवीर हो ॥ चाल ॥ नित्य ऐसा शंकर भोळा वकुळि खालीं राहिला ॥ सत्वरजो गुणतम आत्मक तो वेल तया वाहिला ॥कायसा०॥ ॥ ३ ॥ आहा रम्य स्थळ रचना पाहुनि धन्यधन्य जाहले ॥ लक्ष चौऱ्यांशी योनि फिरतां जीव नरदेहीं आले ॥ श्रीगंगेची मुहूर्त पाहुनि मन हें

उल्हासलें ॥ चतुर स्त्रिया रांगोळ्या काढिती नयनानें पाहीले॥चाल॥कारंजा आहे समोर हो॥ कारंजा०॥कठाडे चवूफेर हो॥कठाडे०॥ पादुकामध्यें सुंदर हो पादु० ॥ नित्य प्रातःकाळीं भक्तजन येती काकड आरतीला ॥ चातुरमासांमध्यें देवराव हें पुढें उभे कथेला ॥ काय सांगु० ॥ ४ ॥ दर्शनाची दाटि जाहली वाट मिळेना जरा ॥ आंधळे पांगळे कितिक म्हातारे कांपति थराथरा ॥ तऱ्हेतऱ्हेचे पोशाख दिधले सुमन तुळशिच्या हारा॥ पायीं नेपुरे वाळ्या· साखळ्या तोरड्या करिती गजरा ॥ चाल ॥ लावण्य मूर्ति गोजिरि हो ॥ लावण्य० ॥ लक्ष्मण सीता सुंदरि हो॥ लक्ष्मण० ॥ पुढें उभे ब्रम्हचारी ॥ हो पुढें ॥ चाल ॥ भरथ शत्रुघ्नासहित तो गंगातिरिं राहिला ॥ उत्साह ऐसा पाहून मनाला आनंद फार झाला ॥ कायसां० ॥ ५ ॥ जंगि पोटऱ्या लांब असोनी कटिं कासिलें पीतांबरा ॥ बाण घेतलें गजरे घातले शिरीं खोंविला तुरा ॥ श्रीवत्सलांच्छन पदक कंठीं विश्व ज्याचे उदरा ॥ मकर कुंडलें कानिं झळाळित जानकीचे वरा ॥ चाल ॥

सरळ नासिक नेत्र कमळी ॥ हो नासिक० ॥ कस्तु-रीचा टिळक भाळीं ॥ हो कस्तुरिचा० ॥ केशराची उटी पिंवळीं हो केशरा ०॥ चाल ॥ असा दयाळू कोणी नाहीं किति वर्णावें याला ॥ अनंत बाळ बाळ गोविंद ते नित्य असति सेवेला ॥ काय सांगू नवल. ॥ ६ ॥

## काशी.

चाल—( वल्कल वेष्टित काया असतां. )

मृत्युलोकीं कैलासी काशीं प्रत्यक्ष सुजन सांगती ॥ अमर यक्ष गंधर्व दक्ष त्या स्थानिं मरण मागती ॥ स्थावर जंगमतिरीं वास त्या ते जान्हवि संगती ॥ तव ते स्वदेही मुक्तिशी प्राणी तरतील सहजागती ॥ चाल ॥ ते शिवकाशीसी पाहिले हो॥ तेशिव०॥ ठायीं ठायीं धरून राहिले ॥हो॥ ठायीं ठायीं ॥कोटी कोटी वेल वाहिले हो०॥कोटी कोटी० ॥चाल॥ सर्व लिंगमय देवळा विरहित नाहीं कोठं काळीं॥वेद घोष हा होतो कोठें महाशास्त्र रुद्र मंडळी ॥ सप्तद्वीप नवखंड पृथ्वि त्याहून आहे वेगळी ॥ त्रिशुळावरती

काशी धरिली शिवशंकर आगळी ॥ १ ॥ धृ० ॥
बिंदुमाधवी त्रिकाळ स्नान हें करिती सकळ येउनी ॥
तव ते विश्वेश्वराचें दर्शन भक्तिभावें घेउनी ॥ मौन्य
धरुनि चालिले आलिंगन पिंपळासी देउनी ॥ गणेश
गंगा करवीर त्याचे चरणामृत वंदुनी ॥ चाल ॥
चला हनुमंत सूर्य भैरव हो ॥ चला० ॥ करितांचि
त्याचा गौरव हो ॥ करितां० ॥ चुकवितां नर्क
रौरव हो ॥ चुकवितां० ॥ चाल ॥ पृथक पृथक
महादेव कुठवर सांगू यांची नामावळी ॥ त्रिशुळा-
वर ० ॥२॥ वसंत कार्तिक माघमासीं जी दिसती
तारांगने ॥ दीपउत्साह नावती टाकुनि जैशी तारांगनें ॥
चतुर स्त्रिया काढिती गोपद्में स्वस्तिक चित्रांगनें ॥
शिंदे भोंसले श्रीमंत प्रभूंनीं स्वर्गीं सत्य भोगणें ॥ ला-
खोनलाख रुपये खर्चुनी बांधिली पटांगणें
॥ चाल ॥ लौकिक अहिल्याबाईचा हो ॥ लौकीक ॥
मध्यें घाट तिच सोईचा हो ॥ मध्ये० ॥
त्या परीस गहिनाबाईचाहो ॥ त्यापरीस ॥
॥ चाल ॥ चला दुपारीं मनकर्णिकेशीं
दाटि कधिं न होय मोकळी ॥ महाक्षेत्रीं
विस्तारणें या ऐसि महिमा भूमंडळी ॥ सत्य० ॥

॥ त्रिशुळा० ॥ ३ ॥ सूर्यवंशिचा भगिरथ राजा परोपकारी केवढा वीर ॥ सगर उद्धरावयास आणिलें भागिरथीचें नीर ॥ गंगा यमुना सरस्वतीचें प्रयागीं पाहणें स्थीर ॥ दहा गांवें पुढें काशी विश्वेश्वराचें निजमंदीर ॥चाल॥ या क्षेत्रीं देह ठेवितां हो ॥ या० ॥ मग जन्ममरण चुकवितां हो ॥ मग० ॥ शिवनामामृत्त सेविता हो ॥शिव०॥ चाल ॥ ब्रम्हदेव चुकले ल्याहावया कपाळीं अक्षर वळी ॥ स्वतः करी उपदेश तारकेश्वर येउनिया या स्थळीं ॥सप्त०॥ ॥ त्रिशुळ ॥ ४ ॥ आहा काशी क्षेत्र पाहुनि कृताथ मी झालों ॥ समाधि ब्रह्मानंदिं लागतां समाधान पावलों ॥ व्यर्थ व्यर्थ चौऱ्यांशी योनी फिरताच मी थकलों ॥ पहिले थडीने चंद्रशेखरा शरण तुला मी आलों ॥चाल॥ महादेव पिनाकेश्वरा हो॥महा०॥ मज रक्षी चंद्रशेखरा हो ॥ मज० ॥ पुढें काशी वास हा खरा हो ॥पुढें०॥ हेतपुरवी पशुपति विनंती जोडुनि बधांजुळी ॥ हेंच मागणें मागें प्रभाकर तुझे पायाची धुळी ॥ स ॥० ॥ त्रिशुळ ॥ ५ ॥

## गौळण.

चाल—( मन हें लावाहो हरीभजनीं. )

गौळणी सांगति गाऱ्हाणी॥रात्रीं वाई आले होचक्रपाणी ॥ खातो बाई दहि दुध तुप लोणी॥ अवघ्याच फोडिल्या विरजणी ॥ सखा बाई कोणासि आवरेना ॥ यश्वदे बाळ तुझा ग तान्हा ॥ कोठवर सोसु मी धिंगाणा ॥ धृ० ॥ १ ॥ दुसरी आली धांवत ॥ रात्रीं बाई माझ्या हो मंदिरांत ॥ येउनी माझ्या गळां पडतो ॥ हात बाई खांद्यावर टाकितो ॥ सखा बाई कोणासी आवरेना ॥ यश्वदे बाळ तुझा तान्हा ॥ २ ॥ तिसरी आली धावोनी ॥ सांनीं बाई काय हो केली करणी ॥ पतिची दाढी हो माझी वेणी॥ गांठ बाई गेलाची देउनी ॥ गांठ बाई कोणासी सुटेना ॥ यश्वदे० ॥ ३ ॥ चवथी आलीसे सत्वरी ॥ रात्रीं बाई तुझाग मुरारी॥ विंचू ते घेउनिया करी ॥ सोडिले माझे ग शेजवरी ॥ ऐसा ग कैसा हा तान्हा॥ बाई तुझा आचपळ हा कान्हा ॥ यश्वदे० ॥ ४ ॥ पांचवी आलीसे आवडीनी ॥ कुठें ग तुझा मोक्ष-

दानी ॥कांखेमध्यें घेउनी नकुळ ॥ रात्रीं बाई आला ग घननीळ ॥ सोडीले माझे ग घरांत ॥ अवघे बाई ह्मणती आले भूत ॥ याचा बाई अन्याय कळेना ॥ कोठवर सोसु मी धिंगाणा ॥ ५ ॥ अवघ्या आल्या मिळोनी ॥ जातो बाई गोकुळ सोडोनी ॥ यश्वदे नयना आले पाणी॥कृष्णबाळा नको करूं करणी ॥ प्रेम बाई प्रेमेशी आवरेना ॥ यश्वदे० ॥ ६ ॥ आवघ्या तुह्मी लटक्या हो गौळणी॥रात्रीं बाई घरीं होता चक्रपाणी ॥ ऐशा गे कैशा वृजवासी ग नारी ॥ सखा माझा घरीं होता श्रीहरी ॥ नाहीं गेला तुमचे हो घरीं ॥ निजला बाई मज पुढें शेजेवरी ॥ सख्यांनो ग अनृत बोलतां ॥ आळ बाई बाळावर घालितां ॥ असें बोले नंदाची हो राणी ॥ कोठवर ऐकूं मी गाऱ्हाणी ॥

## डोहाळे.

चाल—सदर.

सुंदरी काय करीत आहे ॥ राया चर्या तिची पाहे॥ गर्भी व्याकुळ बहु होय ॥ अन्नपाणी नच खाय ॥

तिचे अंगीं घामचि बहु माये ॥ पुसिला स्वहस्तें रायें ॥ उठाव० ॥ हे काय सुंदरी तुज हे डोहाळे सांग तूं मजलागे ॥ सखये इच्छित तूं मागे ॥ धृ० ॥ राजा अंकावर घेऊन ॥ बोले मुख ते कुरवाळून ॥ प्रिये तूं सत्य सांग मजला ॥ सखे तूं सांग कींगे मजला ॥ डोहोळे कायगे होती तुजला ॥ बसली धरुनि मौन्याते ॥ उत्तर नच दे रायाते ॥हें काय०॥ ॥ २ ॥ झटका रायासी देऊन ॥ बोले दूर उभी राहून ॥ बोट तोंडामध्यें ठेऊन॥ राजा मनीं गेलासे भिऊन ॥ आणा पंचाक्षरि पाहून ॥ दावा अथवा द्विज नेऊन ॥ हें काय ॥ ३ ॥ राजा पाचारुनि गुरुला ॥ सांगे वृत्तांत झालेला ॥ मुनिनें कथिलें हो रायाला ॥ पिशाच बाधा नव्हे इजला ॥ राजा हृदयीं आनंदला ॥ गुरुचे चरणीं हो लागला ॥ ॥ हें काय० ॥ ४ ॥ वृत्त हें कथिलें सर्व मुनीनीं गेले आपुले स्वस्थानीं ॥ भरता नउ हो मासाला ॥ राम हा जन्मासी आला ॥ दशरथ आनंदित झाला ॥ गुरुचे पायीं हो लागला ॥ बळवंत लोळे तव चरणीं ॥ रक्षी रक्षी वा चक्रपाणी ॥ हें काय सुंदरी ॥ ५ ॥

## पाळणा.

॥ देह स्थूळ हा पालख ॥ सिद्ध केला देख ॥ चारी पुरुषार्थ सुरेख ॥ लाउन दोरे चोख ॥ जोजो जोजोरे यदुभूपा ॥ कृष्णा चिन्मय रूपा ॥ घेई सुखनिद्र कुलदीपा ॥ माझे हृदयीं वापा ॥ जोजो० ॥ १ ॥ वळीली त्रिगुणाची शुभदोरी ॥ लाविली त्याजवरी ॥ शांति यशोदा घे करी ॥ गातीवाचा चारी ॥ जोजो० ॥ २ ॥ खिडक्या नव दिसती पर्यंक ॥ गुप्त असे निष्टंक ॥ ऐसा पालख अलोलीक ॥ जाणे गुणसात्वीक ॥ जोजो० ॥ ३ ॥ समाधी सौख्याचे सुख सेजे ॥ वरी निजले यदुराजे ॥ विवेक निपूरे पदीं साजे ॥ अनुपम तोरड गाजे ॥ जोजो० ॥४॥ नवविध पदराची शुभकंठी ॥ मुक्ति मुद्रा बोटी ॥ वैराग्य दृढ हिरा निज मुगुटीं ॥ यश तेज्याची दाटीं ॥ जोजो० ॥५॥ श्वासोश्वासाचा लघुवारा ॥ वाहे निपिदिनी सारा ॥ पाजी सत्रावी पय धारा ॥ कुंडलीशी अवधारा ॥ जोजो० ॥ ६ ॥ सकळ ब्रम्हीचा आनंद ॥ तो हा सन्निभ नंद ॥ कवतुक अव-

लोकीं स्मितमंद ॥ नारायण छंद ॥ जोजो जोजोरे० ॥ ७ ॥

## योगी.

चाल—( रघुवीर पाईं शरण० )

॥ बाप ब्रम्हचारी ॥ आई कुमारी ॥ एकविस पुत्र जन्मले उदरी ॥ कैसागे माये ऐसा हा योगी ॥ ज्या ठायीं जन्मला तो ठाव भोगी ॥ कैसा०॥ १ ॥ अनुज्याते लवलाही ॥ सांगु मी कांहीं ॥ बहीण भोगीयली येकेच ठायीं ॥ कैसा० ॥ २ ॥ आचार सोडुनि झालासे भ्रष्ट ॥ माऊशिशीं ज्याणे लाविला पाट ॥ कैसा० ३ ॥ ज्ञानदेव ह्मणे ॥ अनुभव जाणे॥ अनुभवावाचुनी कैचें बोलणें ॥ कैसा० ॥ ज्या ठायीं० ॥ ४ ॥

## सोमाराणी.

चाल—( सोहंप्रकाश० )

॥ सप्त धातुचे धातुचे कांचन गोठली बहुता युक्तिनी ॥ नव रंगाची रंगाची नवरत्नें बसविली

कारागिरीनीं ॥ असेल तीन हिरे तीन हिरेग त्रिगुण सुरती मोत्यें वर दोन ॥ लकेरी बरी बरीग सरजे दोन जसे काय चंद्राचें चांदणें ॥ उलट वर फासा फासा वसवूनि ॥ गुरूनें दिली हो चांदणी॥ सोमोराणी मोराणीग साजणी ॥ गुरूने० ॥ १ ॥ रत्न माणिकें माणिकें अद्भुत लसन्यावर जडिले श्वेत श्वेत कर्पूर कर्पूरग जैसी कांत ॥ मिळवुनी मिळविले अंत ॥ केली एकाकी एकाकींही जडणी ॥ गुरूने० ॥ सोमो० ॥ २ ॥ चमक वर नीळ नीळ सदरेचा सुनीळ गाभा गगनाचा ॥ आंतवा जडाव जडाव रत्नाचा प्रकाश अनंत सूर्याचा ॥ डौल हा कसा कसा कीं मायेचा ॥ कवळीला काम योग्याचा॥ पडली झांपडी झांपडी ब्रह्म भूवनीं ॥ गुरूने० ॥ ॥ ३ ॥ अशी हे माया माया मोराणी नवारंगाचें हें पाणी ॥ पहा पहारे पहा उगीच लोचनीं ॥ मध्वनाथाचा तो धनी ॥ उघड निजवस्तु वस्तु घ्या कोणी ॥ गुरूनें दिली हो चांदणी ॥ सोमोराणी मोराणीग साजणी ॥ गुरूनें दिली० ॥ ४ ॥

# न्हाणोली.

॥ पंचमी बुधवारीं पुष्प नक्षत्रावरी ॥ लाजुन रखु-
माई उभी परसादारीं ॥ देवकी नातु झाला ॥ वसु-
देव आनंदले ॥ धुतारी वाजंतरी ॥ कालुकर्णे
तुतारी ॥ वांकी मृदंग भेरीं चौघडे वाजताती ॥
हालेके शिंगे आरविती ॥ मिळून आवघे आले ॥
वाजा करूं लागले ॥ रखुमाई न्हाण आलें ॥ १ ॥
जिनगर बोलावुनी गजकाड्या आणुनी ॥ मिळूनी
आवघे आले ॥ मखर घालूं लागले ॥ रूप्याचे
रोवोनी खांब ॥ वरती सोन्याची कांब ॥ नवरत्नां-
कीत केले ॥ रखुमाई० ॥ २ ॥ सोन्याच्या कोरिव
जाळ्या ॥ मध्यें सोडिल्या पिवळ्या ॥ वरती हीरे
जडीले ॥ बहु लखलखाट केले ॥ हिरकण्याचे ला-
वून घोंस ॥ जाळ्या मोत्याच्या सांस ॥ चांदवे
किनखापाचे ॥ वरती कळस सोन्याचे ॥ मखर
सिद्ध झाले ॥ रखुमाई० ॥ ३ ॥ पाचुबंद करून
भुई ॥ चौरंग तिठाई ॥ वर बसून रखुमाई ॥ हळद-
कुंकवाची धाई ॥ नेसली जरतारी ॥ चोळी ल्या-

ईली बुटेदारी ॥ नवांगीत नानापरी ॥ भांग टिळा विंदीवरी ॥ केतक राखडी कोयरी ॥ हिरे जोडिले वरी ॥ आवळा नागमुद ॥ मासा कांसव चांद ॥ फुलभोंवरा करवंद ॥ नाग गोंडे घातिले ॥ रखु-माई० ॥ ४ ॥ बुगड्या मोतीयांच्या॥ घोंस वाळ्या वेलांच्या ॥ मासबाळ्या खिडक्यांच्या ॥ मोर-बाळ्या खड्यांच्या ॥ भोंकरवाळ्या वदामवाळ्या॥ रामरक्षा पानबाळ्या ॥ खुदीरेच्या त्रिकुटवाळ्या ॥ फुगीयाच्या लोलकवाळ्या ॥ जडावांच्या जोड-॥ वाळ्या ॥ कुंडलिक नीळफुलें ॥ पके काप कर्ण-फुलें ॥ तानवडे भोकर गाठ ॥ कडुक सांखळी दाट ॥ कानीं केशीं आडकविलें ॥ रखुमाई० ॥५॥ कपाळीं लावून चिरी ॥ वर चंद्र शेजारीं ॥ बिज-वरा विंदीवरी॥ काजळ कुंकु कोरी॥ नाकीं ल्याली बेसर ॥ मोरणी नथ मोठी फार ॥ घाली काढी वरचेवर ॥ हनवटीवर हिरवी डाळ ॥ मणी जाळी-चा पोकळ ॥ तनमणी देतो ढाळ ॥ कशी शोभे वेल्हाळ ॥ मंगळसूत्र पोतपेंडे ॥ लखलखी पदक पेट्या गोंडे ॥ तानवड्या टीका तांदुळ्या ॥ हरपर

# न्हाणोली.

॥ पंचमी बुधवारीं पुष्प नक्षत्रावरी ॥ लाजुन रखु-
माई उभी परसादारीं ॥ देवकी नातु झाला ॥ वसु-
देव आनंदले ॥ धुतारी वाजंतरी ॥ कालुकर्णे
तुतारी ॥ वांकी मृदंग भेरीं चौघडे वाजताती ॥
हालके शिंगे आरविती ॥ मिळून आवघे आले ॥
वाजा करूं लागले ॥ रखुमाई न्हाण आलें ॥ १ ॥
जिनगर बोलावुनी गजकाठ्या आणुनी ॥ मिळूनी
आवघे आले ॥ मखर घालूं लागले ॥ रुप्याचे
रोवोनी खांब ॥ वरती सोन्याची कांब ॥ नवरत्नां-
कीत केले ॥ रखुमाई० ॥ २ ॥ सोन्याच्या कोरिव
जाळ्या ॥ मध्यें सोडिल्या पिवळ्या ॥ वरती हीरे
जडीले ॥ बहु लखलखाट केले ॥ हिरकण्याचे ला-
वून घोंस ॥ जाळ्या मोत्याच्या सांस ॥ चांदवे
किनखापाचे ॥ वरती कळस सोन्याचे ॥ मखर
सिद्ध झाले ॥ रखुमाई० ॥ ३ ॥ पाचुबंद करून
भुई ॥ चौरंग तिठाई ॥ वर बसून रखुमाई ॥ हळद-
कुंकवाची घाई ॥ नेसली जरतारी ॥ चोळी ल्या-

ईली बुटेदारी ॥ नवांगीत नानापरी ॥ भांग टिळा बिंदीवरी ॥ केतक राखडी कोयरी ॥ हिरे जोडिले वरी ॥ आवळा नागमुद ॥ मासा कांसव चांद ॥ फुलभोंवरा करवंद ॥ नाग गोंडे घातिले ॥ रखुमाई० ॥ ४ ॥ बुगड्या मोतीयांच्या ॥ घोंस बाळ्या वेलांच्या ॥ मासबाळ्या खिडक्यांच्या ॥ मोरबाळ्या खड्यांच्या ॥ भोंकरवाळ्या बदामबाळ्या ॥ रामरक्षा पानबाळ्या ॥ खुदीरेच्या त्रिकुटबाळ्या ॥ फुगीयाच्या लोलकबाळ्या ॥ जडावांच्या जोडबाळ्या ॥ कुंडलिक नीळफुलें ॥ पके काप कर्णफुलें ॥ तानवडे भोकर गाठ ॥ कडुक सांखळी दाट ॥ कानीं केशीं आडकविलें ॥ रखुमाई० ॥५॥ कपाळीं लावून चिरी ॥ वर चंद्र शेजारीं ॥ विजवरा बिंदीवरी॥ काजळ कुंकु कोरी॥ नाकीं ल्याली वेसर ॥ मोरणी नथ मोठी फार ॥ घाली काढी वरचेवर ॥ हनवटीवर हिरवी डाळ ॥ मणी जाळीचा पोकळ ॥ तनमणी देतो ढाळ ॥ कशी शोभे वेल्हाळ ॥ मंगळसूत्र पोतपेंडे ॥ लखलखी पदक पेट्या गोंडे ॥ तानवड्या टीका तांदुळ्या ॥ हरपर

जोड्या पुतळ्या ॥ मोहर चाफेकळी ॥ कंठा गोफ सांखळी ॥ मोतिया पोवळ्यांचीं ॥ हार चिंतांक सालीची ॥ ताइत आहे खोल ॥ जडावाचे कारल ॥ तुळबंद्या बाजुबंद ॥ हातीं ल्याईली छंद ॥ दाव-पट्टा त्याजवरी ॥ वांकीगोंडे शेजारीं ॥ करणे कारागिरीं ॥ टिक पोवळ्यावरी ॥ पाटल्या गोटदो-रें ॥ नविन केलें कोरें ॥ कांकणे हातसर ॥ जडीली नक्षीदार ॥ जव रेशमी पटलिले ॥ रखुमाई० ॥६॥ कांकणे मनगट्या ॥ चुडे खिसमिशी सां मोठ्या ॥ छंद गजरे आंगठ्या ॥ तोडे टिका गोमट्या ॥ पायीं पैंजण घुंगुरपाळे ॥ चालते लेंकुर चाले ॥ जोड सांखळ्या बरोबरी ॥ नक्षी केली तोड्यावरी ॥ जोडवी हनुवट ॥ मासोळ्या केल्या नीट ॥ विर-वल्या विंचू मोरें ॥ फुलें कोयरी कोल्हारे ॥ अशी ल्याली वेल्हाळी ॥ चालते हंस चाली ॥ रखुमाई न्हाणवली ॥ ७ ॥ बैसली भोजनाशीं ॥ चौरंग बैसायाशीं ॥ तिवईवर ताटवाटी ॥ मुलींची झाली दाटी ॥ लोटी जांव पाण्याची ॥ घाई झाली भोज-नाची ॥ समया दोहींकडे ॥ उदबत्यांची लावून

झाडें ॥ रांगोळी तयापुढें ॥ घ्या ह्मणती वाढायाला॥ मुली बसवा पंगतीला ॥ उशीर झाला नाहाणो-लीला ॥ प्रहर दिवस आला ॥ घ्या ह्मणती वाढा-याला ॥ मुलीबाई सून पंगतीला ॥ पापड गुर-वळ्या ॥ कोशिंबरी केल्या कोवळ्या ॥ साली पापड मीठ ॥ लगबगीनी वाढा नीट ॥ सांडगे कोहळ्याचे ॥ मेतकुट तिळकुटाचे ॥ करबंदे आंबे मेथी ॥ माईन मुळे तिखट होती ॥ शेंदवली ईड निंबे ॥ केळी पेरू केनी जांबे ॥ तिखट कोमर्मीरे ॥ आले आहे मा जरे ॥ माका आमसोल आले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥ ८ ॥ पडवळ शेंगावांगी ॥ भरली मिरची लवंगी ॥ काशीफळ भोपळा ॥ चा-कवत पोकळा ॥ मेथी तोंडली टाकळा ॥ केला तांदुळजा मोकळा ॥ कारली मेथीयाची ॥ गोड भाजी भेंडयाची ॥ वाघोटी वेलाची ॥ भाजी केली फणसाची ॥ दोडकी चिचोडी ॥ आवडीनें लावी-तोंडीं ॥ केनी कुंजर चांदवेल ॥ सराटा मोरवेल ॥ राजगीरा लपेटान ॥ कारंदा सुरण कोन ॥ पड-पाला पवाडा बरा ॥ अंबाडी हारभरा ॥ रान भो-

पळा केळे आलें ॥ हादगा केळफुलें ॥ तेरडा तळ घोळ वाळा ॥ गूळघोस चंदनबटवा ॥ आनंदफळ नागरमोथा ॥ आवडीने केला होता ॥ भाजी केली वांग्याची ॥ टरकाकडी वाळुकाची ॥ गोळा भाजी फांदीची ॥ कढी केली लिंबाची ॥ आमटी सुंदर डाळीची ॥ आवड सांभाऱ्याची ॥ पोकळा आघाड्याचे ॥ खमंग आळण कांद्याचें ॥ गोळ्याच्या वेलाचे ॥ सर्व केले आवडीचे ॥ सांभारी झालीं थोडीं ॥ पक्वान्नाची बहुगोडी ॥ चिंचवणी आणि सार ॥ तोंडी लाविले काले ॥ रखुमाई० ॥ ९ ॥ भात वरण पोळ्या पुरी ॥ मांडे घीवर भारी । वड्या रोट्या तेलवड्या ॥ पुरणाच्या पोळ्या गोडया ॥ नाजूक गुळपोळ्या.॥ खव्याच्या साखर पोळ्या ॥ वडया आणखी सांजा असे ॥ खांडवी आनारसे ॥ शंकरपाळे गुरवळी ॥ आवडीने श्रीखंड गाळी ॥ सारनोळ्या कानवले ॥ लाडू बुंदीचे केले सरळ शेवयाचे ॥ ताट भरलें जिलबीचे ॥ बासुंदी मोदक ॥ साखरेचे केले चोख ॥ दहींदूध मधखाशी ॥ गहुले मुखवेलयासी ॥ करंज्या केल्या मऊ ॥ गोड

लागती बहु ॥ मोहोनभोग आणि साय ॥ तिसी आवडते काय ॥ केशर आहे सुरस ॥ भाताचा येतो स्वास ॥ शिखरणी आंबेरस ॥ रायपुरी साखरेस ॥ नारळभात मालपुवा ॥ पातवडया शिराखवा ॥ कागदी केला मेवा ॥ आतां सावकास जेवा ॥ मसाली वांगीभात ॥ खोबरें घाली त्यांत ॥ मसाल्याचीं लाल सोजी ॥ कांद्यांचीं केलीं भजीं ॥ हलवा पुढें वाडीती ॥ गुरोळी घेई हातीं ॥ मालसा बोले फणवलें ॥ नायवळ गोड केले ॥ वाढणें आटोपलें ॥ रखुमाई नाहाण आलें ॥१०॥ भोजन झाल्यावरी ॥ विडा घेते सुंदरी ॥ सुपारी पान चुना ॥ काथ लवंग आणा ॥ कापुर वेलदोडे ॥ स्वाद जायपत्रीकडे ॥ केशर जायफळ ॥ सांत घातला कंकोळ ॥ आक्रोड आणि कस्ते ॥ मधीं घाला बदाम पिस्ते सोनेरी वर्ख वरी ॥ विडा खाते सुंदरी ॥ चतुर्थ दिवसाशीं ॥ रखमाई बसली नाह्याशी ॥ उटणें लावायाशीं ॥ पाणी ठेविती दासी ॥ हाळद केशर मोगरेल ॥ अत्तर चंदन उदेल ॥ उष्ण तें पाणी केले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥ ११ ॥ मोसाची

घालून जाळी ॥ घोस दिसली मंडावळी ॥ हात देतें मखरावरी ॥ तिथें दिष्टाळली भारी ॥ आवघ्या आरत्या ओंवाळीती ॥ कोणी दृष्टही काढीती ॥ माणके चौक भरले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥१२॥ मुळेची पाठविली ॥ चोहुंकडे धाडीली ॥ कौंडण्यपुरा गेली ॥ सोयरीं सर्वही आलीं ॥ मंडपांत बैसली ॥ त्यांत लाजूं लागली ॥ लाजता काहो कान्हा ॥ देवकी ह्मणे तान्हा ॥ धरीती पदरानें ॥ आम्हीं धरूं शेल्यानें ॥ ऋषी सर्वही खोळंबले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥१३॥ यशोदा ह्मणे कान्हा याला कांहीं कळेना ॥ हावीती गोपांगना ॥ यावर घाली तुफाना ॥ मिळून राधा राही ॥ ह्मणती हो सासुबाई ॥ तुम्हांस ठाऊक नाहीं ॥ आनंदे शेषशाई ॥ खदखदा हासले ॥ जगन्नाथ उठले ॥ मंडपामध्ये गेले ॥ नमस्कार करून आले ॥ ऋषी सर्व आनंदले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥ १४ ॥ बोलाविते रखुमाईला ॥ लाजते श्रीकृष्णाला ॥ शालजोडी पांघरला ॥ हारळी पिळायाला ॥ नाक न दिसे त्याला ॥ सुभद्रा ह्मणे तिला ॥ नको आडवूं

देवाला ॥ आहेर होतांना त्याला ॥ कडाखा एकच झाला ॥ दोदारी रोखणे भांड्याचे । आवाज होती तोफांचे ॥ बंदूका नीत नाहीं ॥ चौघड्याची झाली घाई ॥ बरकंदाज केले उभे ॥ हरी द्वारकेचे सुभे ॥ दक्षणा झाल्यावरी ॥ ओटी भरी श्रीहरी ॥ बरे ह्मणे मुरारी ॥ तुम्हीं चेष्टा केल्या भारी ॥ काढीन यमुना तिरी ॥ हारी आनंदे बोले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥ १९ ॥ सागर मंदिरांत ॥ काय वर्णू मी त्यांत ॥ गयकरणी निमीत्त ॥ देव आले आनंदांत ॥ पाचेचे भूमीवरी ॥ रंग दिला नानापरी ॥ तळ-खडे हिऱ्याचे ॥ खांब ते रत्नाचे ॥ उथाळी दार्मे-दाचीं ॥ आडवाट निळाची ॥ तिथे भिंत सोन्याची झालर किनखापाची ॥ मंचक हो शेषाचा ॥ वर पती रखुमाईचा ॥ धनी आवघे त्रिभुवनाचा ॥ तेह-तीस कोटी देव आले ॥ नमस्कार करून गेले ॥ मही सर्व आनंदले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥१६॥ फुलाची घालून शेज ॥ वरती श्रीरंग निज ॥ रखु-माई शृंगार साजे ॥ विडा देतांना लाजे ॥ गोविंद धरी करी ॥ बैसवी मंचकावरी ॥ खिडक्यांतून पाहती नारी ॥ दोघे निजली शेजेवरी ॥ हरी ह्मणे

सुभद्रेला ॥ वरदान दिलें तुला ॥ हें गाणें शिकल्यानें ॥ ऐकिलें एकमनें ॥ अक्षय सौभाग्य त्याना ॥ पुण्य नाहीं गणना ॥ निदानीं पुत्रवंती ॥ बहु मिळे संपत्ति ॥ दरिद्र स्वप्नीं नाहीं ॥ ऐसें ह्मणे शेषशाई ॥ अंतीं येईल विमान ॥ वर देई नारायण ॥ हरी गुण गाईले ॥ रखुमाई नाहाण आलें ॥ १७ ॥

## मोहोनिरूप.

चाल–हरी भक्तीविण जन्म०

॥ मुख चंद्रा सभवती अभरणे सूर्य प्रभेवत दिसती ॥ सुंदर याची सीमा न वर्णवे ईश्वराची नट मूर्ती ॥ विसरूनी भांडण दैत्य चकीत मन वेडेपीसे मग होती ॥ मुर्छागत होती सोडुनी आले काजा ॥ मोहोनी रूपें भगवान स्वयें नटला हो देव काजा ॥ श्रीपती देव काजा० ॥१॥ गलबा उठे कर कंकण सह हावभाव किती करतीं ॥ चालती हळू हळू वाजती पैंजण निऱ्या कसेवर धरती ॥ वक्षस्थळीं हें पदर आवरणें वरवर किती सावरतीं ॥ आसुरसुर भुलले पाहाती मजा ॥ मोहोनी० ॥ श्रीपती० ॥ २ ॥ वेळोवेळां वर खालीं ॥ पाहाती काय डाव्या गालावर हसती ॥

किती स्वरूपाची ठेवण ॥ वर्णु मदन स्वयंभच मूर्ती ॥ विष्णुदासामती प्रेमांगित पाजा ॥ मोहो० ॥ ॥ श्रीप० ॥ ३ ॥

## डाकुरजी.

चाल--( वारीयाने कुंडल हाले. )

॥ श्री मुगुट कुंडले हरी ॥ हिरा झळकतो मुद्रिके-वरी ॥ गळां शोभती मोत्यांचे हार ॥ याला दागिने आहेत फार ॥ कलगी तुऱ्याला खूप देते फार ॥ पुढें बोलती चोपदार ॥ मुरली वाजवी बनशी वाजवी अधरामृतानीं ॥ सखा चांदीचे सिंव्हासनीं॥ उभा राहिला मोक्षदानी ॥ सखा० ॥ १ ॥ मुरली वाजवी हात वाकुडे ॥ चोर नदर राधेकडे ॥ भाद्र-पदीं सांजे येती पुढें ॥ जन बनशीवाले गाती पवाडे ॥ ॥ मुरली० ॥ सखा ॥ उभा० ॥ स० ॥ २ ॥ सभा मंडपापुढें ॥ दीपमाळा दोहींकडे ॥ घागर द्रव्याची घेतली पुढें ॥ शेज मंदीर डावीकडे ॥ छपरपलंग तो देवाला ॥ कसा शोभतो बनशीवाला ॥ मु० ॥स०॥ ॥ उ० ॥ सखा० ॥३॥ उजवीकडे गोमतीचा घाट॥

राधे कुंडल नीट जाते वाठ ॥ वाटेवरी हनुमंत असे ॥ सन्मुख गणपति दिसे ॥ मु० ॥ स० ॥उ०॥ ॥ ४ ॥ पौर्णिमेची यात्रा आली फार ॥ घाला तुळशीचे हार ॥ साखर लोणी प्रिय देवाला ॥ कसा शोभतो वनशविाला ॥मु०॥ब०॥अ०॥सखा०॥ ॥ उ० सखा० ॥ ५ ॥

## सीतास्वयंवर.

चाल—( शहरपुण्यामध्यें० ).

॥ जनकनंदिनी उपवर झाली वर विवंचना करी पिता ॥ स्वरूप सुंदरा द्यावी कोण्या भुपाळाला ही सीता ॥ स्वरूप हिचें लावण्य प्रभाती चंद्राची प्रतिमा विलोकितां ॥ सूर्य प्रकाशित दंत झळकती जशी लावण्याची ही सरिता ॥ हीस नोवरा स्वयंवर मांडुनी दूत धाडिले द्वीपांतरीं ॥ कमलनयन रघुराज धनुर्धर नवरा, त्याची मी नवरी ॥ भूमीबाळा ह्मणे नृपाळा या दशकंठा मी न वरी ॥ या दशमौळा मी नवरी ॥कमल०॥धृ०॥१॥पूर्वीं परशुधर चाप ठेवुनी भद्रीकाश्रमीं तो गेला ॥ सा चापाचा

करुनी घोडा सीता फिरवी आंगणाला ॥ ऐसें कौतुक पाहुनि रायें मनामध्यें निश्चय केला ॥ त्रिवक चाप परशधराचें न उचले कोण्या रायाला॥ ऐसें धनुष्य चढवुनी भंगिल त्याला द्यावी ही नवरी ॥ कमल० ॥ २ ॥ खंडोखंडीचे भुपाळ येती सभे बैसती जनकाच्या ॥ रावणासी पत्र नसतां भुप पातला लंकेचा ॥ पाहुनी बाळा मनीं त्रासली सखयाप्रति बाळा बोले ॥ पण हा तातें दुस्तर केला दुर्घट मजला वोढवलें ॥ प्रार्थितसें कुळ शिवाला ती प्रार्थितसे कुळदेवाला ॥ रावण मेला डोंगर काळा यावर घाला कोणी घाला ॥ श्री महादेवा शंकर सांभा संकट माझें निवारी ॥ कमल० ॥ ३ ॥ रायें नवरी शृंगारोनी हस्तीनी पृष्ठीं बैसविली ॥ शुंडादंडी माळ देऊनी रंगशिळेवर उभी केली ॥ पाहूनी बाळा रावण उठला आनंद झाला चांडाळा॥ त्रिवक चाप परशुधराचें येऊनी पडलें उरावरी ॥ भडभड भडभड रक्त ओकितो रावण दाही मुख पसरी ॥ कमलनयन० ॥ ४ ॥ पाहुनी विश्वामित्र म्हणावी उठी राघवा वा रघुराया ॥ अंगुष्टानीं चाप

उडवुनी भणिली आपुली मूळमाया ॥ मुहूर्त पाहुनी लग्न लाविलें साडे झाले चौदिवशीं ॥ आंदण देउनी बहु सन्मानानें पोंचविले निजनगरासी ॥ रामकथा अमृतांत अमृतपक्कान्नामध्यें शिरापुरी ॥ कमल-नयन० ॥ भूमी बाळा० ॥ ५ ॥

## वनराम.

चाल—( लंकापुरी पुरीराज्यनगरी ).

॥ वरून आणीली, आणिली ग सवतीला ॥ तेव्हां अयोध्यापती भुलला ॥ सदावर्ततो, वर्ततो तिचे बोला ॥ राज्य जरी देतां, भरताला ॥ असे वाटते, वाटते सौख्यमनीं ॥ कसें करूं आतां सखे सजणी, ग जातसे वना ॥ श्रीराम चाप पाणी ॥ कसें करूं०॥१॥ कोणी तरी जागे ॥ दशरथा चरणीं लागा ॥ पदर पसरुनी केवी सांगा ॥ मी याचकी, याचकी दान मागा ॥ ओटी भरा रमारंगा ॥ किर्ति होईल, होईल त्रिभुवनीं ॥ कसें करूं ॥ २ ॥ वसिष्ट गुरू, गुरू कृपेचा ज्ञानसिंधू ॥ तोही स्वरूपीं स्वानंदू ॥ न वदे कांहीं, कांहीं एकवचनी ॥ कसें करूं ॥ ॥ ३ ॥ दशरथराये, राये वर दीला ॥ गुंतले कैकई

दशरथ रायें, रायें वर दिधला ॥ गुंतलें कैकइ-वचनाला ॥ भरत हा राज्यीं राज्यि बैसवीला ॥ सोहळा वनिचा रघुपतिला ॥ शोक हा करिती करिति सर्व सेना ॥ वना धाडिला राम तान्हा ॥ कैकई भवली, भवलीं मम प्राणा ॥व ० ४ ॥ दुःखमय प्राणा, प्राणा त्यजु पाहे ॥ भेट दे सद्गुरु त्वलाहे ॥ राम हा हृदयीं, हृदयीं भरलाहे ॥ हृदयीं शोधुनिया पाहे ॥ भाव धरुनि सासी, सासि पहा नयनीं ॥ कसेंकरु ॥जा०५॥ अयोध्या नगरीं नगरीच्या राया ॥ रविकुल मंडण तूं सखया ॥ योगि मुनि ध्याती ध्याती तव नामा ॥ निरंतर स्मरतें तुज रामा ॥ विनंतीस करी, करी जनकबाला ॥ वनीं मज न्याहो घननीळा ॥ विनं० ॥ ६ ॥ सर्व तईं त्यजिलें, सजिलें सुखशयना ॥ निघाले पित्याचिया वचना ॥ बंधु सौमित्र, सौमित्र सूजाण ॥ करी कोदंड चाप बाण ॥ रुदन ते करितें, करितें वेल्हाळा ॥ व०॥ विनं० ॥७॥ तुह्माविण न गमे, न गमे रघुनाथा ॥ अयोध्यापते सिताकांता ॥ पुरे गोपुरें, पुरे महाल यानें॥हिऱ्याच्या खाणी ही रत्नें ॥ नको धन मजला मजला सुख

सोहळा ॥ व० ॥ विनं० ॥ ८ ॥ राम कनवाळू, कनवाळू बाई ॥ अंतरगृहीं सिताबाई ॥ वल्कलें वसनें वसनें, लवलाही ॥ स्वतां नेसवी शेषशाई ॥ सवें जानकिती, जानकि वेल्हाळा ॥ व० ॥ विनं० ॥ ॥ ९ ॥ अयोध्यास्वामी, स्वामीची माता ॥ दुःख जाहलें या समस्ता ॥ सकल नरनारी, नारीदुःख-हर्ता ॥ श्वापदें पक्षी गहिवरता ॥ दयानिधि रामा, रामा जगपाला ॥ व० ॥ विनं० ॥१०॥ एक साजणी, साजणी कर्म थोर ॥ अयोध्या कुमार सकुमार ॥ वनें दारूण, दारुण भयंकर॥ स्नुषा जानकी बरोबर॥ वसंतिक ऋतू, ऋतू ऊष्ण महिना ॥ व० ॥ कैकई ॥ व० ॥ ११ ॥ भुकेली झाली, झाली वेल्हाळा ॥ सिता सुंदरी जनकबाळा ॥ राम लक्ष्मण, लक्ष्मण सांवळा ॥ क्षुधातुर होती कळवळा ॥ खडे हे रुतती, रुतति चालतांना ॥ वना. ॥ कैकई ॥ व० ॥ १२ ॥ लौकरी आणा, आणा रघुराणा ॥ जाइ तूं सुमंत प्रधाना ॥ दाखवा कोणी, कोणि चंद्रवदना ॥ पाड-सा चुकली हे हरिणा॥ अकांता करी, करि कौसल्या सजाना ॥ व० ॥ कैक० ॥ वन ॥ १३ ॥ हृदायें तो

स्मरला, स्मरला जगजिवन ॥ भेटले वसिष्ठ येऊन ॥ राम अंतरीं, अंतरि हे खूण ॥ वेद श्रुतिचें हें वचन ॥ नाथ गोपाल, गोपाल वदे तान्हा ॥ व० ॥ कैक० ॥ व० ॥ १४ ॥

## वनराम.

चाल—( दिंडी. )

राज्य देवो भरतास भूपती तें ॥ नका धाडूं काननीं रघुपतीतें ॥ पदर पसरुनि मी काकुलती येते ॥ स्वामिनीं तें सोडीलें सर्व नातें ॥ १ ॥ वनीं कैसा जाशील राजसारे ॥ कुठें पाहूं मी तुला पाडसारे ॥ कसा घेशील वनिं वेष तापसाचा ॥ समय आला तुजसि बा नष्ट साचा ॥ २ ॥ कसे सवतीशीं नाथ वशचि झाले ॥ कैकईच्या वचनांत रमुनि गेले ॥ राज्यपदही देवोत तत्सुताला ॥ परी न घडो वनवास राघवाला ॥ ३ ॥ प्राणनाथा परिसिजे गुणसगुणा ॥ नका पाठवुं काननीं रघूराणा ॥ लक्ष्मणाचि तो जाणार तया मार्गे ॥ समय ओढवला सर्व सत्राते रागें ॥ ४ ॥ राज्यपादें माझा राम बैसण्याला ॥ सर्व

गुण संपन्नहि योग्य असे झाला ॥ किती वर्णू गुणराशि जानकीला ॥ ऐन वेळीं हा डाव साधियेला ॥ ५ ॥ जगज्जननी जानकी वना गेली ॥ कशी चाले चालता थकुनि गेली ॥ कोमलांगीं पाउलीं सूज आली ॥ प्रखर तापें तापूनि लाल झाली ॥ ६ ॥ कशी वेळा लागली मुहूर्ताला ॥ पडलि कैशी भूलही त्या मुनीला ॥ हर्ष झालासे बहुत सुमंताला ॥ परी क्षणमात्रें सर्व लया गेला ॥७॥ कैकईचे अपराध काय केले ॥ बाळ माझें मजलागिं दूर केलें ॥ राम जननीसी गुरू काय बोले ॥ तुझे उदरीं हें परब्रह्म आलें ॥ ८ ॥ वचन माझें तूं ऐक अतां माते ॥ सोडवीलें पाहिजे सुरवरांतें ॥ मुक्ति दिधली पाहिजे रावणाते ॥ ठाव चरणीं देई तूं सदा श्रीतें ॥ ९ ॥

## राम.

चाल—(कोण कुठिल तूं चोर०)

सीतेवाचुनी कांहीं गमेना ॥ भेटीचा कां योग जमेना ॥ कमल सुमोहित चित्त रमेना ॥ कपट्यानें हो नेली, हिरावोनि कपट्या०॥ राम ह्मणे या समयिं

वनांतरीं त्यजुनि कुठें गेली ॥ प्रिया मज त्यजुनि कुठें गेली ॥धृ०॥१॥ चंद्रप्रभा बहु तापहि देती ॥ ऊष्णाच्या किती लहरी येती ॥ विरहानल ज्वालेला भरती॥ बहुतचि ती आली ॥ प्रीयेविण बहुतची ती आली ॥ राम ह्मणे० ॥ २ ॥ पावन सीताऽवयव सुरंगा ॥ शुक गज हंसाहि मयुर कुरंगा ॥ हसलों तें फळ आलें अंगा ॥ मैत्री तोडियली ॥ कुणाची मी मैत्रि तोडियली ॥ राम ह्मणे ॥ ३ ॥ शेषशयन नारायण यावें ॥ शोकाग्नीतें त्वां विझवावें ॥ द्विपद चतुष्पद किति विनवावें॥इकडुन काय गेली ॥जानकी, इकडून. ॥ राम ह्मणे या समयीं वनांतरीं त्यजुनी कुठें गेली ॥ ४ ॥

## मुद्रिका.

( चाल—उद्धवा शांतवन करजा )

पापिणीग मी सकुमारा पाठविलें हारिणामागें॥ पूर्ण भक्त सौमित्रातें दुर्वाक्यें छळिलें रागें ॥ राक्षसीं ग मजला आणिलें फळ त्याचें आलें वेगें ॥ चाल दु. ॥ सेवे कां निशिदिनिं झटला ॥ हा ऋणानुबंध जरि सुटला॥ मम लोभ कसा हा तुटला (चाल

पाहिली ) अंतरला मज रघुराजा ॥ मुद्रिके सांग मजलागीं सुखि आहे राघव माझा ॥ धृ० १ ॥ भास्करकुलिं ह्मणवुनि कां गे निष्ठुरपण मजवरि केलें ॥ पसरितें पदर मजकडुनी अपराध बहुत जरि झाले ॥ ही क्षमा करावी मुद्रे मज पळ हें युगसम गेलें (चाल दुसरी) चिंतेनें काळिज झडलें ॥ अंतर का मरणा पडलें ॥ राक्षस हे कोपा चढले ॥ ह्मणती खा चावा भाजा ॥ मुद्रिके सांग मजलागीं० ॥ २ ॥ सखये का आलिस मुद्रे टाकुनि मम प्राणविसावा ॥ इच्छिताति त्याला योगी निजहृदयीं नित्य वसावा ॥ तुजलागीं तिळभर ऐसा निष्ठुर हा भाव नसावा ॥ चाल दु० । हे लोक सुखाला टपले ॥ परि प्रसंगीं न ह्मणा आपुले ॥ ज्ञान तुझें ह्मणवुनि खपलें (चाल प० ) बाइ आलिस कोण्या काजा ॥ मुद्रिके सांग मजलागी० ॥ ३ ॥ प्रभु प्राणसखा मजसाठीं वनिं हिंडतसे अनवाणी ॥ सोशितसे मम तापासी शीत उष्ण वारा पाणी ॥ सखि सीते ऐसें वदतो श्रीरामचंद्र दिनवाणीं (चाल दु०) लक्ष्मणासि व्यर्थचि छळिलें ॥ रघुपतिचें अंतर पडलें ॥ सुख विश्रांतीला मुकलें ॥ भेटवा ग मज रघुराजा ॥ मुद्रिके सांग मजलागी० ॥ ४ ॥

# पद रामाचें.

चाल–(मज बहुतचि ही आशा).

तूं जाईरे शरण श्रीरामाला ॥ जो दीनरक्षणीं सजला ॥ धृ० ॥ सांप्रत त्यासि जरी करुणेंपरि गाइयलें ॥ तरि दूर नाहिं धरियेलें ॥ शुक नामें रे गणिकेनें वाहियलें ॥ तिज वैकुंठीं पोचविलें ॥ अति पापीरे अजामीळ ऐकियले ॥ त्या पुत्रमिषें तारियलें ॥ वाल्या कोळ्यानें दुष्ट आचरण केलें ॥ श्रीराम नाम उद्धरिलें ॥ चाल दु० ॥ हा राम दयाळु कितिहो ॥ पाहीना अवगुण रतिहो ॥ एक नाम घेतां प्रीती हो ॥ तारियलें बहुतामती हो ॥ चाल पहिली ॥ तरि याहो या लागा तच्चरणाला ॥ जो दीनरक्षणीं सजला ॥ धृ० १ ॥ मज जीव नको जन्म नको रघुराया ॥ दाखवी तुझ्यारे पाया ॥ तुज वाचुनिरे आस नसे कोणाची ॥ प्रीति ती तुझ्या चरणाची ॥ तुजसाठीं रे प्राण ठेविला कंठीं ॥ मी दिवस मोजितों बोटीं ॥ चाल दु० ॥ ये धांवत सखया रामारे ॥ मन मोहन मेघश्यामा रे ॥ नरहरी दीन विश्रामा रे ॥ तुजवाचुन नाहीं आम्हारे ॥

चाल प० ॥ हो सावध रे कर जोडुनिया त्याला ॥ जो दीनरक्षणीं सजला ॥ २ ॥ तूं सावध हो भ्रमलासी का मूढा ॥ झालासी कैसा वेडा ॥ गृह संपत्ती यांचा पायीं खोडा ॥ यामाजी कैचा जोडा ॥ यमपीडा रे होइल तुज निर्वाणीं ॥ मग फिरसी रानोरानीं ॥ या वचनातें हृदयीं सत्यचि मानी ॥ हो गुंग भक्तिच्या स्थानीं ॥ चाल दु० ॥ ऐसें मी तुज प्रार्थीतों ॥ हा काल कसारे जातो ॥ जो काल स्मरणाविण जातो ॥ भिमदास ह्मणुनि विनवीतो ॥ ॥ चाल प० ॥ कर साधनरे ये पुनरपि जन्माला ॥ जो दीन ॥ ३ ॥

## ॥ साखळी ॥

( अंत्रगात्माला )

॥ श्री दत्त,स्वामि अवधूत,अत्रिचे सूत साखळीं ग्रामीं ॥ ॥ पातले कृपेनें भक्तरक्षणा स्वामी ॥ धृ ॥ हे स्थान पाहतां मान जाउनी ध्यान गुरूचें लागे ॥ कोणीही पाहिल्यानाची परतत्रे मागें ॥ जपमाळ डमरू तेजाळ कमंडलु शूळ अरीदर जो घे ॥ नवरंगि पादुका पदीं धरत अनुरागे ॥ न्यहाळूनि

गौडद्वीजिं वळुनी निरखि कळवळुनी रक्षणा जागे ॥ गुरूनिंदा लाजविं वळें स्वलीला भागे ॥ चा० ॥ किती चरित्र गुरूचें वाचती ॥ किती दत्त ह्मणुनी नाचती ॥ किती रूद्रा ध्याये अर्चीती ॥ तिन वेळ, भुतांचा खेळ, होत कल्होळ लोळती सौधीं ॥ गुरु प्रधान ब्रम्हा स्पष्ट बोलतो व्याधी ॥ श्रीगुरूद० ॥ १ ॥ अघहरू औदुंबर तरू पृष्टिसीं नरू पाहुनी हर्षे ॥ श्रीदत्त प्रेमधन भक्त चातकीं वर्षे ॥ भोंवती भक्त राहती, सदा पाहती, गुरूची लीला ॥ तीन काळ अर्चना येत नरांचा मेळा ॥ लडिवाळ, शुद्र गण मेळ, पुढाति करी खेळ, भजन रस आळवी ॥ श्रीदत्त मुनी-श्वर भीती साची पळवी ॥ चा० ॥ ऋषिमेळ निशीधी येऊनी ॥ श्रुति घोष कारिती जया पाहुनी ॥ हा अनुभव आला मज मनीं ॥ गुरूराव पाहु-नी भाव येई घे धाव, पुरवि मनतृष्णा ॥ नच कूपोदक तें स्पष्ट भासतें कृष्णा ॥ श्रीदत्त० ॥ २ ॥ चलदला, सुवासिनि मुलासाठीं पिंपळा ॥ प्रदक्षणा कारिती ॥ कीति माळा धरुनी स्तोत्र जपा आचरती ॥ प्रतिरांकी, निघे पालखी, नरांचे मखी दत्त हें नांव ॥ पुढें महाजनादी गाति ध-

रुनि दृढ भाव ॥ बहुचपळ, परी मन आमळ, होउनी अचळ, वेळ ती पाहते ॥ भू वैकुंठचि मज तयासम स्थळ दिसते ॥ तो थाट नसे तिळ वाट, गर्जती भाट, गुरूचे भक्त ॥ जे गृहादि सोडुनि जाहलेहि आसक्त ॥ चा० ॥ नीर्शी शेजार तीतें सारुनी ॥ नर जाती घरातें परतुनी ॥ किती वर्णु स्थळाची काहणी ॥ गुरु धणी, धांवे तो झणी भाव मनि आणि, दुजे नच कांहीं ॥ कांसारिं गौतमी गुप्त आलि अल पाई ॥ श्रीदत्त० ॥ २ ॥ मज आली, प्रचीती भली, दत्त माउली कृपाळु जाहली ॥ नीचांही जाचिलें परी तृषा वाचविली ॥ दृष्टांति, गुरूची मूर्ति, मजसी सांगती जाहली ऐका ॥ तूं रहा स्वस्थसा तुला घडेना धोका ॥ हायहाय, दिनाची माय, हीचे जो पाय, विसरुनी बसला ॥ तो मनुष्य जन्मीं सत्य येउनी फसला ॥चा०॥ मज तार आतां श्री नरहरी ॥ मज नाहिं तुझ्याविण भूवरी ॥ तूं माउली माझी धर करी ॥ मतीमंद, करित हा छंद, धरुनी आनंद, स्वरुपीं मज नेई ॥ हा गणक शिरातें ठेवि सिता पति पायीं ॥ श्री दत्तस्वा० ॥

# त्रिजटा.

वनोपवनिं वल्कलें वेष्टुनी वनवासा कंठिलें ॥ गहन कर्म सामर्थ्य सखये रिपु राक्षसिं त्रासिलें ॥ निराहारि उपवाशी कधिं कधिं कंदमुळां सेविलें ॥ वरी निकट प्रिय सौमित्र मला तें दुःख सौख्य वाटलें ॥ दुर्दैवी पाह्हा कसी नेणवे मन कंचुकी वधलें ॥ सुवर्णमृग काननीं पाहुनी पति-हनना धाडिलें ॥ ॥चाल दु०॥ अकस्मात सावरिही ध्वनी ग ॥ अकस्मात०॥० हे धांव धांव सौमित्रा काननीं हो ॥ हे धांवधां० ॥ मज विकळ फार केलें हे दुर्जनीं हो मज वि० ॥ चा० प० ॥ ऐकुन श्रवणीं न जाणुनि मी निर्जर रघुनंदना ॥ शब्द शरें ताडुनी धाडिल लक्षुमणा शोधना ॥ सुदिन दिवस हा उदय कधिं पाहिन प्रिय स्वामिना॥किती आंवरूं त्रिजटे पतीचा विरह आतां साहिना ॥ सुदिन दिव० ॥ धृ० ॥ तिव्र उष्ण चालतां उमटती विस्फुट कामिनी ॥ पाहुनि द्रवे दाटती मम ते अंतरीं गजगामिनी ॥ लहान सखे सौमित्र अगदींच बाळदशा अजुनि ॥ गहिंवरोन कळवळलें हृदयीं निर नेत्रीं दटुनि ॥

तृषाक्रांत देखुनीहि द्यावें मज उदकाचि भांजनी ॥ वि-
तुष्ट नव्हे तुष्ट सदा संतुष्ट वचन रंजनी ॥ चाल दु० ॥
या परी काळ क्रमुनि साजणी ग ॥ या परी० ॥ त्या
पर्णकुटीं आह्मी असतां रानीं ग ॥त्यापर्ण० ॥ काप-
ट्य वेषें मज आणिलें भोगणी ग ॥ काप० ॥ चा०
प० ॥ अंतरलें दिनमणी सुखासी कांहीं रुचेना
मना ॥ विहिनविना प्रियपती घडो कीं देह पडो
हा सुना ॥ ० सुदिन० ॥ किती० ॥ २ ॥ मंगळ
स्नानें दान करुनिया राजपदा बैसणें ॥ अशांत
केलें दुष्ट कैकइनें दूर ममवर मागणें॥निकट नेम सा-
जणी प्रभूला मरयादे वागणें ॥ घोर विपिन सेविलें
पिसाञ्ज्ञें उपमा ते कारणें ॥ होणें जाणें रिणानुबंधें
पूर्वार्जित या गुणें ॥ निढळ कुडेंमुळ खरें काय मग
इतरां दोष लावणें ॥ चा० दु० ॥ अहा काय मा-
गणेंच होतें विधीपूजन ग ॥ अ० ॥ राहुत्रें अशा
वनवामा पति त्यागुन ग ॥र० हा० ॥ नाहिं पुनरपि
सन्मुख ते आले अजुन ग । नाहिं पु० ॥ चा० प०॥
कोणतें दैवत भजुन रूजु होईन ही आराधना ॥
सांग न साहे आतां पतिची विरह ज्वलन वेधना ॥

सुदि० ॥ किती आ० ॥ सु० ॥ ३ ॥ मदसौम्यस्मित वदन शरदेंदु विमल शामळें ॥ सजुनि विषय ऐश्वर्य सुशिल वैराग्य निवळ सेविलें॥रंजन खग द्विज लता तरू मुनिजन सर्वे सुख भोगिलें ॥ जग जुट पटी सुभट कटी धृत कार्मुखें अरि त्रासिले ॥ अति रमत मम लालित तन वहित गुज आनुवादिलें ॥ विनयान्वित पदीं सुखे निकेमधिंच दुरित ठाकलें ॥ चा० दु० ॥ हे सांग सांग प्रियकर्णे त्रिजटे ग ॥ हे सां० ॥ हा वियोग मम दैवींचा कधीं फिटे ग ॥ हा वियो०॥ त्यावांचुनि न गमे कांहीं मन विटे ग ॥ त्यावां० ॥ एवंरीती आहाळता सिता सखि स्वता करित शांत्वना ॥ जगन्नाथ गण गात सुगमपथ सुगम स्वहित साधना ॥ सुदि० ॥ किति० ॥ सु०॥४॥

## ॥ धावा द्रौपदीचा ॥

चाल—( आज अक्रुर हा नेतो० )

ये धांवत ये आई कृष्णाबाई ॥ राखोनि मला यश देई ॥ धृ० ॥ ये संकट हें आजि नये सांगाया॥ ॥येइना जगीं वागाया॥ हा मेला दुर्योधन मज

आलिंगाया ॥ इच्छा कारि व्रत भंगाया ॥ वैसे मांडि-
वरी ह्मणतो सुख भोगाया ॥ लागतील जन तुज
गाया ॥ हें वचन नव्हे कालिजगा तुज गाया ॥
जड करवतरे अंगा या ॥ चाल ॥ म्यां दिधला याला
शाप हो ॥ म्यां दिधला याला शाप ॥ नाहींच जया
उः-शाप हो ॥ नाहीं० ॥ संचरला हृदयीं कोप हो सं० ॥
ह्मणवूनि बहु संताप हो, ह्म० ॥ चाल ॥ हा दुः-
शासन उठविला मी कांहीं ॥ राखोनि० ॥ ये
धांवत ॥ १ ॥ हे गुंतले युधिष्ठिर वचनीं न वदे
कांहीं ॥ ही संपदा मागुनि पाही ॥ हा नागाइत
बलसंपन्न वृकोदर पाही ॥ शांतिचाच दिसतो देही ॥
याला अर्जुन धरतो उगाच बाही ॥ सोडीना कां
लवलाही ॥ नकुल सहदेवाचा भ्रम होता तोही ॥
मज कामा आला नाहीं ॥ चाल ॥ भीष्म द्रोणादिक
हे साधु हो ॥ दिसतात कसे असाधू हो ॥ पाहतात
टकमक भोंदू हो ॥ शतसंख्या हे खल बंधु हो ॥
कर्णासह शकुनी हंसति आपले ठायीं ॥ राखोनि
मला यश देई ॥ ये धांवत ॥ राखो ॥ २ ॥ दुःशा-
सन धरूनी निरि ते बोटी होती ॥ ते दुर्जन सर्वहि
पाहती ॥ हे सज्जन निज नयानें लाउनी पाती ॥

मोन्यास धरुनि राहाती ॥ हे कौरव ते मेले खदखदां हांसती ॥ रद विचकुनि दावीताती ॥ हा मंदमती वृद्ध सोडुनी नाती ॥ सुत बुद्धीनें नाचताती ॥ ॥ चाल ॥ इतक्यांत विदुर मामाजी ॥ आणि विकर्ण हे भावोजी ॥ कड ओढित कांहीं माझी ॥ आणि यांच्या दुष्ट समाजीं ॥ चाल ॥ नायकोचि करुणा कांहींहो ॥ पडले या ठायीं ॥ ये धांवत ॥ ३ ॥ तुज-वांचुनरे नाहिं कुणी जगदीशा ॥ सर्वांची झालि निराशा ॥ ये धाउनिया माझी पुरवी आशा ॥ छेदी या दुर्जन पाशा ॥ लागलि जीवासी तळमळ आजि अविनाशा ॥ जळ विरहित जैसा मासा ॥ ॥ चाल ॥ ये धांउनि श्रीगोपाळा ॥ करि करुणा पूर्ण कृपाळा ॥ लाजवि हा दुर्जनपाळा ॥ चा-ल ॥ भाकुनिया करुणा आठवलें जलशाई ॥ राखोनि ॥ ये धांवत ॥ ४ ॥ करुणा परिसतांचि राजा आला द्वारावतीचा ॥ जो जिवलग वंधु सती-चा ॥ हृदयिं प्रगटला निर्मळ भाव तीचा ॥ निश्चय हा संतमतीचा ॥ नेसविला पितांबर विपुल कांतीचा, फिटलासे संशय तीचा ॥ चाल ॥ अघटीत ज्याची करणी ॥ लिहीतां पुरेना धरणी ॥

तारीलि अहिल्या चरणीं ॥ रत व्हावें त्याचे चरणीं ॥ चाल ॥ हा सखाराम सुत ठेवि आपुलें ठायीं ॥ राखोनि मला यश देई ॥ ये धांवत ये आई कृष्णाबाई ॥ ८ ॥

## बडोदें.

चाल—सद्दर.

थिर बडोदें सखे सर्व शहर गुलजार ॥ जेथें गुजर नांदती फार ॥ त्या ठाइ सखे राव राजे मल्हार ॥ अंगि पुष्ट्य ध्याची तार ॥ जसा गोकुळिचा कृष्ण नांदे साचार ॥ तसा त्यानें केला कहर ॥ चाल ॥ करि मन्मथ त्यावरि छाया ग ॥ किति मृगाक्षि लागति पाया ॥ कां मोहीं पडशिल वाया ग ॥ सोड सोड आतां जाऊंदे आह्मांला ॥ कसा गजेंद्र मोक्षा गेला ॥ काय वर्णु आतां अगाध ईश्वरी लीला ॥ कसा ॥ १ ॥ छान खंडेराव राजा होउनि गेला ॥ थरथरा भीति जन त्याला ॥ त्यानें इंग्रेजी पावर चालु नचि दिधला ॥ त्याचा धाक इंग्लंडाला ॥ खेळे कुस्ति सदा नाहिं रणांतुनि फिरला ॥ ज्यानें दृडपुनि साहेब

धरिला ॥ चाल ॥ बहु शूर तो रणशूर ग ॥ असे विष-
यापासुनि दूर ग ॥ दिसे उग्र सदोदित नूर ग ॥
॥ चाल ॥ नाहीं क्रोध मनीं शांत असे दासाला ॥
कसा० ॥ २ ॥ खंडेरावाची पत्निग जमनाबाई ॥
किति सेवे असतिल दाई ॥ नाहीं पुत्र कुसीं यास्तव
उदास पाही ॥ निशिदिनीं स्थीर मन नाहीं ॥
स्थिर मन करण्या दत्तक अंकीं घेई ॥ त्याचें नांव
सयाजी ठेवी॥चाल॥ बहु स्वरूप गुण बहु छान ग ॥
करि विप्रा गाईदान ग ॥ अतितांसी देई मान ग ॥
चाल ॥ नसे दुर्गुणि तो मोद होय राणीला ॥
कसा गजेंद्र० ॥ ३ ॥ बहु प्रीतीनें राज्यीं स्थापित
केला ॥ अधिकार राणिनें दिधला ॥ नाहिं पारावार
शहरामध्यें हर्षाला ॥ जन आले समारंभाला ॥ अ-
धि सरटी तो पात्र रजेला झाला ॥ मग प्रधान
शाबुदिन केला ॥ चाल ॥ भालचंद्र गुणी डाक्तर ग ॥
त्यावर खुप मर्जी फार ग ॥ जो शस्त्रविद्येमध्यें थोर
ग ॥ मग लक्ष्मण तो पावे दिवाणगिरीला ॥ कसा
गजेंद्र० ॥ ४ ॥ भालचंद्राचा बंधु आनंदी प्राणी ॥
गेली देहावरची बाणी ॥ फेरफटक्याला जातां

अश्वावरुनी ॥ टाकिली कमान मोडोनी ॥ मग ज-
ज्जांनीं टाकिलि उडि कष्टांनीं ॥ तो अश्व पळे
जोरांनीं ॥ चाल ॥ तो नरवर शीवपुरीं गेला ॥
मग जज्ज पायिं घरीं आला ॥ जिवावरचा प्रसंग
टळला ॥ चाल ॥ सखी यमुना ही हस्त जोडि देवाला ॥
सुखी ठेवि सयाजि प्रभूला ॥ ५ ॥

## फुगडी.

चाल—( जा जा जा तुह्मी झटकारे ).

समजुन घाली फुगडीगे ॥ कोठें न दिसे उघडी गे ॥
विषय सुखाला विघडीगे ॥ द्वैत पसारा लुगडी गे॥१॥
विधि निधि मांडी झांकी हो ॥ निर्भय पाऊल
टाकी हो ॥ होउन एकाएकीं हो ॥ निज सुख आ-
पुलें राखी हो ॥ २ ॥ गोदावरि तूं पुण्याची ॥ वेणी
आवरि त्रिगुणाची ॥ भीड न धरि तूं कवणाची ॥
आण सद्गुरू चरणाची ॥ ३ ॥ फुगडी घालुनि
निरुती गे ॥ नाहिंतर होई परती गे ॥ मध्वनाथ
चतुराई गे ॥ मिरउन होउ उतराई गे ॥ समजुन
घाली० ॥ ४ ॥

# चोवीस नावाचा धावा.

सगुणरूप जाहलासि मच्छकेशवा, नारायण नाम तुझें मोहन माधवा, अखिल जगत परीपूर्ण विश्व भूषणा, धांव धांव धांव आतां धांव निर्गुणा, निरांजनी निर्विकल्प जाणसी खुणा, धांव धांव धांव आतां धांव निर्गुणा ॥ १ ॥ गोवर्धन उचलीला गोविंदा तुवां, विष्णु नाम विश्वसखा तारि वैष्णवा, मधुसूदन अन्नोदक देशि या जना ॥ धांव० ॥२॥ त्रिविध ताप हारकसा तूं त्रिविक्रमा, वांछित फल पूण काम वामनोत्तमा, श्रीधर जरि नाम तुझें दिपत्ति कामना ॥धांव०॥३॥ हृषिकेश तूं पद्मनाभ श्री दामोदरा, वासुदेव पाव आतां प्रद्युम्नेश्वरा, संकर्षण पाव तूंची बोधि मन्मना ॥ धांव० ॥ ४ ॥ अनुरुद्धा श्रद्धा फार तुझिच लागली, पुरुषोत्तम पुराणांत कीर्ति ऐकिली, अधोक्षजा नारसिंह भव्य चेतना ॥ धांव० ॥५॥ अच्युता तरि अंत किती पाहसी आतां, जनार्दना आणि मनादीन अच्युता, उपेंद्रहरे प्रसाद देई देई तूं आतां, गणेश बालकासि सदा देई शान्तता ॥ धांव० ॥ ६ ॥

## पक्षी.

आह्मी पक्षी नभगामी, दैवें झालों नभ गामी ॥ होतों वनिं हरणीं नभ गामीं ॥ ह्मणुनी आलों नलग्रामीं ॥ ह्मणुनि प्रार्थितों तव पायां,मजला कां धरिलें वाया॥ पक्षी विनवी नलराया, मजला कां धरिलें वाया ॥ ॥ १ ॥ कांता माझी गर्भवती, फीरत होती मज भोंवतीं ॥ आजवरि चिंता मनीं नव्हती, आतां शून्य दिशा दिसती ॥ व्याकुळ झाली रे मम काया, मजला कां धरिलें वाया ॥ २ ॥ माता माझी म्हातारी, दिन वनीं होईल ती भारी ॥ मजविणें तिजला रे संसारीं, नाहीं कोणी अधिकारी ॥ ह्मणुनि प्रार्थितों तव पायां, मजलां कां धरिलें वाया ॥ पक्षी० ॥ ३ ॥ मजला सोडि तूं भूपाळा, मिळऊन देईन वेल्हाळा ॥ आणुनि देतों रे मी राया, रतिसम तुजलागी जाया ॥ लक्ष्मी लागे हरि पायां ॥ मजला कां धरिलें वाया ॥ पक्षी०॥४॥

## धांवा.

( चाल शैवालें युक्त जैसें पंकज तें शोभतें ).

बहु शिणले नेत्र माझे हरि कांहो येइना ॥ धृ० ॥ दोन प्रहर रात्र झाली ऋषि आले भोजना ॥ नि-

द्रिस्त आह्मी होतों सांहि केलें आगमना ॥ स्नाना-सी पाठवीलें करुं कैशी योजना ॥ वहु० ॥ १ ॥ दुर्वास ऋषी क्रोधें आतांची येईल ॥ घावरला जीव माझा ब्रीद तुझें जाईल ॥ या समयीं नीज आली कां जागा होईना ॥ वहु० ॥ २ ॥ धांवोनी येई वेगें हरि माझे हांकेशीं ॥ कैवारी बंधुराया आज माझे पाठिशीं॥ घावरला जीव माझा धरि मजला पोटाशीं ॥ या समयीं नीज आली कां डोळा उघडीना॥वहु० ॥३॥ ऐकुनिया दीनवाणी झडकरि तूं आलासी॥ मजलागीं पावला गे वंधू हा ऋषीकेशी ॥ ऋषि सर्व तृप्त केले महिपती गाजसी ॥ नरहरी दासालागीं दुःख होतां राहिना ॥ वहु शिणले नेत्र माझे० ॥ ४ ॥

## दत्ताचें पद.

(चाल-सुंदर मुख तुंदिल तनु नंदिके० )

॥ श्रीसद्गुरु दत्तमूर्ति अत्रिनंदना ॥ कमलोद्भव कमला तव करिती वंदना ॥ स्वस्वधर्म वर्धनार्थ प्रगटसी जनीं ॥ शत्रु मित्र सुजन कुजन भेद ना मनीं ॥ धरुनि चरण होय शरण करिशी सा धनी ॥ वानिता, दुहिता, स्वहिता पाहति गती चाहती न ती, वाहती अती, हरीति मध्दना ॥ श्री सद्गुरु दत्त० ॥ १ ॥

निगमागम मर्म कथुनि गुप्त राहसी ॥ लोकत्रय येथुनि तूं सर्व पाहसी ॥ भक्तदुःखसिंधु मथुनि क्षेम वाहसी ॥ गातां, ध्यातां, आतां; भाव भरें, पाव त्वरें, धांव हरे, तोडि बंधना ॥ २ ॥ काम जाल रामबालकावरी पडे ॥ म्हणुनि धाय मोकलोनी संसृती रडे ॥ तुजवांचुनि जावें तरी सांग कोणिकडे ॥ माता, ध्याता, आतां; तूंच खरा, नीच नरा, धरुनि करा, दावि मध्वना॥ श्रीसद्‌गु०॥३॥

## मुद्रिका.

चाल—( खरी झाली दृष्ट माझी० )

॥ मुद्रीके सांग बाई रघुराजा स्वस्त कीं ॥ दुष्ट तो रावण गे बहु झाला मस्त कीं ॥ प्रभु नमतां सन्निधान मज धरिलें हस्तकीं ॥ मन माझें साजणी गे या समयीं घाबरें ॥ मुद्रीके सांग बाई कां त्यजिलें रघुविरें ॥ उठाव ॥ दैवरातें बोलिलें मी निष्ठुर हीं उत्तरें ॥ मुद्रीके सांग बाई० ॥ १ ॥ सखे बाई रघुरायें मजला कां त्यागिलें॥ मागिल तें सौख्य माझें ते कैसे विसरले ॥ भंगोनी शिवचापा मज त्यानें वरियलें ॥ या समया रामराया निष्ठुरता टाकीरे ॥ मुद्रीके०॥

उठाव ॥ देवरातें बोलीलें० ॥ मुद्रीके सांग० ॥ २ ॥ मुद्रीके मन माझें रामाचे सूगमों ॥ नच कळतां सत्य वाक्या सागीन हा प्राण मी ॥ शरणचि हा तूज आलों रामाचा दूत मी ॥ लंका ही दग्ध केली तूं जाण वानरें ॥ मुद्रीके सांग बाई० ॥ उठाव ॥ देवरातें बोली- लें० ॥ मुद्रीके० ॥ ३ ॥ नलगे ही काय चिंता रघुराज येईल ॥ मारोनी रावणातें तुज माते नेईल ॥ सोडोनी सुरवरातें यश मजला देईल ॥ सदाशीवकन्यकेतें तूं आतां तारि रे ॥ मुद्रीके० ॥ उठाव ॥ देवरातें बोलिलें मी निष्ठुर हीं उत्तरें ॥ मुद्रीके सांग बाई० ॥ ४ ॥

## रासमंडळ.

॥ ऊठ सुंदरी चाल सत्वरी ॥ रास मांडीला यमुने- तिरीं ॥ तुला ग पाहतो कुंजभीहरी ॥ उठाव ॥ हातीं मुरलि घेउनि उभा रासमंडळीं ॥ वाट पाहतो तुझी ग ते स्थळीं ॥ वाट पाहतो ॥ उ० ॥ चंद्र जसा शोभतसे नभिमंडळीं ॥ वाट पा० ॥ १ ॥ कासें पींवळा सोनकीसळा ॥ भाळें रेखिला कस्तुरी टिळा ॥ वैजयंतिही शोभते गळा ॥ उठाव ॥ मुखीं रंगलासे विडा ओंठ पोऊळी ॥ वा० ॥ हातीं० ॥ वा० ॥ चंद्र० ॥

वा० ॥ २ ॥ सरळ नासिक कमल नयन ॥ कृपावंत तो विश्वभूषण ॥ नुलंधि कदा भक्तिमोचन ॥उठाव॥ ऊठ आतां कुंकू सखे लावि नीढळी ॥वा०॥ हा० ॥ वा० ॥ चं० ॥ वाट पा० ॥ ३ ॥ जडित मुगुटसे मस्तकीं तुरा ॥ शाल हिरवी झळकतो हिरा ॥ किती ग वर्णु या मूरलीधरा॥उठाव॥ चाल सखे बाई आतां करी उतावळी ॥ वा०॥ हा० ॥ वा० ॥ चं० ॥ वाट पा० ॥ ४ ॥ राधिका ह्मणे नष्ट हा हरी ॥ प्रीत याचि गे गौळणींवरी ॥ हरि ग गोपिची खोडी जे करी ॥ उ० ॥ मच्छ तेच साहीना चित्त झळझळी ॥ वा० ॥ हा० ॥वा०॥चं०॥ वा०॥५॥ तुला ग न्यावया मजसि धाडिलें ॥ हरीनें तुला हात जोडीले ॥ विनति करूनिया सखे ग वाहिलें ॥उठाव॥ ऊठ वया चाल वेगें नको धरूं आळी ॥ वा० ॥ हा ०॥ वा०॥ चंद्र०॥ ॥ वा० ॥ ६ ॥ उठ सखे आतां वेणीफणी करी ॥ काजळ कुंकूं हें लावि तूं चिरीं ॥ जाळी मोत्याची घाली गे शिरीं ॥उठाव॥ ऊठ जरतारी नेस लेई काचोळी॥वा०॥ हा०॥ वा०॥ चं०॥ वा० ॥७॥ मजवांचुनी रास मांडीला ॥ हरि ग गोपीशीं रंग खेळला॥ समारंभि तो विसरला मला ॥उठाव॥ असें असून कोण याची सोसि गे रळी ॥ वा०॥ हा०॥ वा०॥ चं॥

वा० ॥ ८ ॥ राधिके तुझें मूख कोमेलें ॥ ह्मणून हरिनें मूळ धाडिलें ॥ चल सखे आतां मज ग निरविलें ॥उठाव॥ तुजवीण खिन्न सखे झाला वनमाळी॥ वा०॥ हा० ॥ वा०॥ चं०॥ वा० ॥९॥ मिळुन गौळणी रंग ओतिला ॥ आनंदाचा दिवस सखे आज वाटला ॥ हरि ग राधेशीं रंग खेळला ॥उठाव॥ गुलाल वुक्का करून एक हरि ग ऊधळी ॥ वा० ॥ हा०॥ वा० ॥ चंद्र० ॥ वा० ॥ १० ॥

## नारद.

लाजशरम सोडुनी निसंग घरनीघी । नारदा निसंग घरनीघी ॥ चित्त चांदण्यामधें सखे मीं टाकिली पलंगडी ॥ सखे मी टा. ॥ वोधाचे मदनात सखे बाई झालें मी वेडी ॥ सखे. ॥ वैराग्यशांति सुपारी पानें भरूनिरे तवकडीं । नारदा भरूनिरे तवकडी ॥ विवेकाचा चुना लाविला बनावली वीडी । नारदावना. ॥ तम तमाखु जाळावया जवळ गुरुगोडी । नारदा जवळ ॥ सत्रावीचे पाणी आणुनी भरलें हेंच घडी । ना. भर. ॥ घडी घडीचे रंग करीतो साजण वहुरंगी ॥ नारदा साजण.॥ परपुरुष भोगिला परंतु पाप नाहीं अंगीं । ना. पाप ना. ॥१॥ क्रोध माझा

वा० ॥ २ ॥ सरळ नासिक कमल नयन ॥ कृपावंत तो विश्वभूषण ॥ नुलंधि कदा भक्तिमोचन ॥उठाव॥ ऊठ आतां कुंकू सखे लावि नीढळी ॥वा०॥ हा० ॥ वा० ॥ चं० ॥ वाट पा० ॥ ३ ॥ जडित मुगुटसे मस्तकीं तुरा ॥ शाल हिरवी झळकतो हिरा ॥ किती ग वर्णु त्या मूरलीधरा॥उठाव॥ चाल सखे बाई आतां करी उतावळी ॥ वा० ॥ हा० ॥ वा० ॥ चं० ॥ वाट पा० ॥ ४ ॥ राधिका ह्मणे नष्ट हा हरी ॥ प्रीत याचि गे गौळणींवरी ॥ हरि ग गोपिची खोडी जे करी ॥ उ० ॥ मच्छ तेच साहीना चित्त झळझळी ॥ वा० ॥ हा० ॥वा०॥चं०॥ वा०॥५॥ तुला ग न्यावया मजसि धाडिलें ॥ हरीनें तुला हात जोडीले ॥ विनति करूनिया सखे ग बाहिलें ॥उठाव॥ ऊठ बया चाल वेगें नको धरूं आळी ॥ वा० ॥ हा ०॥ वा०॥ चंद्र०॥ ॥ वा० ॥ ६ ॥ उठ सखे आतां वेणीफणी करी ॥ काजळ कुंकू हें लावि तूं चिरीं ॥ जाळी मोत्याची घाली गे शिरीं ॥उठाव॥ ऊठ जरतारी नेस लेई का-चोळी॥वा०॥ हा०॥ वा०॥ चं०॥ वा० ॥७॥ मजवां-चुनी रास मांडीला ॥ हरि ग गोपींशीं रंग खेळला॥ समारंभि तो विसरला मला ॥उठाव॥ असें असून कोण याची सोसि गे रळी ॥ वा०॥ हा०॥ वा०॥ चं॥

वा० ॥ ८ ॥ राधिके तुझें मूख कोमेलें ॥ ह्मणून हरिनें मूळ धाडिलें ॥ चल सखे आतां मज ग निरविलें ॥उठाव॥ तुजवीण खिन्न सखे झाला वनमाळी॥ वा०॥ हा० ॥ वा०॥ चं०॥ वा० ॥९॥ मिळुन गौळणी रंग ओतिला ॥ आनंदाचा दिवस सखे आज वाटला ॥ हरि ग राधेशीं रंग खेळला ॥उठाव॥ गुलाल बुक्का करून एक हरि ग ऊधळी ॥ वा० ॥ हा०॥ वा० ॥ चंद्र० ॥ वा० ॥ १० ॥

## नारद.

लाजशरम सोडुनी निसंग घरनीघी । नारदा निसंग घरनीघी ॥ चित्त चांदण्यामधें सखे मीं टाकिली पलंगडी ॥ सखे मी टा. ॥ बोधाचे मदनात सखे बाई झालें मी वेडी ॥ सखे. ॥ वैराग्यशांति सुपारी पानें भरूनिरे तवकडीं । नारदा भरूनिरे तवकडी ॥ विवेकाचा चुना लाविला बनावली वीडी । नारदा-बना. ॥ तम तमाखु जाळावया जवळ गुरुगोडी । नारदा जवळ ॥ सत्रावीचे पाणी आणुनी भरलें हेंच घडी । ना. भर. ॥ घडी घडीचे रंग करीतो साजण बहुरंगी ॥ नारदा साजण. ॥ परपुरुष भोगिला परंतु पाप नाहीं अंगीं । ना. पाप ना. ॥१॥ क्रोध माझा

भ्रतार साला ठेउनि आलें घरीं । नारदा ठेउनि. ॥ मला लागलें वेड मी हींडतें परद्वारीं । नारदा हीं-डतें. ॥ आशा माझी सासू हीसी करुन आलें चो-री । नारदा करुन. ॥ वासना नणंद हीका राखण मजवरी ॥ नारदा राख. ॥ अहंकार सासरा हा का-य पूर्वीचा वैरी । नारदा पूर्वी. ॥ दंभ आणि प्रपंच दीर मज नलगे सौसारीं। नारदा नलगे. ॥ ईतक्यांना हात जोडुनि बाई मी झालें दुज आंगीं । नारदा झा-लें.॥परपुरू. ॥ नारदा पा०॥२॥ भावाचे शेजेवर गेलें केव्हढेरे काळीज । नारदा केवढे. ॥ द्वईत भान उडालें साजणी मला नाहीं लाज । साजणी मला ना. ॥ चतुर्दळ षडदळ दशदळ त्यावरी आलें मी सह-ज । ना. आलें. ॥ द्वादश दळ षोडशदळ त्यावरी द्विदळाचि मौज ॥ ना. द्विद. ॥ सहस्त्र दळावरी दशम द्वारीं गेलें उलंघूनी । ना. गेलें उ. ॥ परपु. ॥ ना. पा. ॥ ३ ॥ भक्तीग माझी कुंटण तीनें दाखविला धनी । नार. दाख. ॥ दिव्य रूपवळ लाया जो-ती जळताती दोन्ही । ना. जळ. ॥ अहंसोहं सेवा करीतें जवळ बैसोनी । ना. जव. ॥ ईडापिंगळा मार्ग शुशुन्मा प्राण करी वेरीज । ना. प्राण. ॥ उन्मळेचे द्वारीं अनुहत वाजवी पुंगी ॥नार. वाज. ॥ पर०॥ना.

पाप०॥४॥ त्रिवेणीचा संगम तेथें चिन्मयाच राज्य ॥ नारदा चिन्म. ॥ शुद्धमतीचे वंगल्यामध्यें निद्रागत वहिणी ॥ ना. निद्रा. ॥ प्राणसखा ओळखीला सखे मी त्याचें आंगणी । नार. साचें. ॥ भक्तराज कृष्णाजी गीत गातो आभंगीं ॥ नार. गातो. ॥ परपु. ॥ ना. पा. ॥ ५ ॥

## चिलिया.

मुख कुरवाळून हृदयीं धरूनी ॥ चुंबीती वदना प्रती ॥ अरेबाळा चुंबि. ॥ आई मम मांस दे अतीतांप्रती ॥ धृ० १ ॥ अतीत नव्हे हा शंकर आहे । कैलासीं ऊमापती ॥ अंगे आई कैला. ॥ आई मममां. ॥ २ ॥ माया उचलुन कडेवर घेई ॥ नेतसे वधाया प्रती ॥ अरे देवा नेत.॥ आई मम मां. ॥ ३ ॥ मी पण गेलों स्वल्पण वाया ॥ तो शल ऊमापती । अगे तो. ॥ आई म. ॥३॥ बाळ म्हणे माते येईन उदरीं ॥ नको धरूं शोकाप्रती ॥ आगेआ० ॥ आई म. ॥ ४ ॥ शंकर तेव्हां प्रगटाचि झाले ॥ अंकीं घे बाळा प्रती ॥ शिवहर अं. ॥ आई. ॥ ५ ॥ नृपती श्रीयाळ जायाही चांगुणा ॥ जातिहो कैलासाप्रती । ऊद्धरोनि जाति० ॥ आई मम मांस दे अ० ॥ ६ ॥

## पुंगी.

अनुहात वाजवी पुंगी ॥ बावाजोगी ॥ अनु. ॥ अनंत युगाचा अतीत ॥ दोन्ही दोरे पावनसूत. ॥ झोळी शिवली सप्तधातूंत चऊखाणींची केळी त्रिभुत ॥ लाविली अंगीं ॥ अनु. ॥ १ ॥ चौशुन्याच्या घातल्या वाटा ॥ गगन कैलासीं गोविल्या जटा ॥ त्यानें मेरूचा केला सोटा ॥ सप्त सागरचा केला घोटा ॥ मीनमार्गीं ॥ अनु. ॥ २ ॥ चवदा चक्रांची बांधीली मठी ॥ हातीं घेउनी ज्ञानतुंबडी ॥ चंद्र सूर्य दीप जोडी ॥ लाविली सिंगी ॥ अनु. ॥३॥ ऐसा तो सन्यासी निर्गुण ॥ निरालंब नीरांजन ॥ करीतो त्रिवेणीचें स्नान ॥ दिसतो भ्रमर गुंफेंतुन ॥ ऐसा तो योगी ॥ अनु. ॥४॥ ऐसा तो गोसावी भेटला ॥ पेला ब्रह्मींचा पाजिला ॥ रामदास तयाचा चेला ॥ युगान यूगीं ॥ अनु० ॥ बावा. ॥ ५ ॥

## शकुंतला.

( चाल—चित्रकूट नग सोडुनि राघव ).

ऐक नृपा दुःष्यंत महिपती पुत्र इलीनाचा ॥ न्याय सांग वेदांत मिमांसा साठा शब्दांचा ॥ तो नृप एके दिवशीं गेला कण्व आश्रमाला ॥ पुसे कथा जन्मेजय

वैशंपायन वक्साला ॥ भारत ऐसें किमर्थ वदती आमचे पूर्वजाला ॥ पुसे कथा जन्मेजय वैशंपायन वक्साला ॥ १ ॥ पर्णकुटीं रमणीय मनुष्याविण गृह सामुग्री ॥ पाहुनि राजा गर्जुन बोले कवणचि अधिकारी ॥ शब्द ऐकितां दुहिता त्याची चित्र मानी चतुरी ॥ हंसगती लावण्यचंद्रिका आली बाहेरी ॥ दर्भासन देऊनि नृपातें प्रश्न करी चतुरी ॥ कवण तुह्मी ही वार्ता घाला मच्छ्रुतीच्या विवरी ॥ बहुत शहाणी पाहुनि भूपति संतोषें भरला ॥पुसे०॥भारथ०॥ पुसे०॥ २ ॥ ऐक मृगाक्षी पुरुवंशज मी राजा दुःष्यंत॥ श्रवणीं ऐकिला असेल जरी तरी ओळखी विख्यात ॥ उर्ध्वरेत मी कण्व ऐकिला त्याचे उद्रांत ॥ कशिग जन्मली कन्या मज हें सांग यथायुक्त ॥ ऐक नृपाळा येथचि आला एक मुनीनाथ ॥ तो मुनी पुसतां सर्व कथीयला कण्वें वृत्तांत ॥ तेच सांगतें तनमन द्यावें माझ्या कथनाला ॥ पुसे० ॥ ३ ॥ तिव्रतपातें करितां पाहुनी विश्वामित्रातें ॥ भिउनि सुरेशें तिथें धाडिली शिघ्र मेनिकेतें ॥ सर्वे घेउनी सुगंध मालती आली विपिनातें ॥ तीरीं वसनें सोडुनि उदकीं शिरली स्नानातें ॥ चीरकंचुकी उडोन गेली व्योमिगंधवातें ॥ धांउनी गाधीसुत आडवी तिज धरून क्षणी

## पुंगी.

अनुहात वाजवी पुंगी ॥ बावाजोगी ॥ अनु. ॥ अनंत युगाचा अतीत ॥ दोन्ही दोरे पावनसूत. ॥ झोली शिवली सप्तधातूंत चऊखाणींची केली विभुत ॥ लाविली अंगीं ॥ अनु. ॥ १ ॥ चौशुन्याच्या घातल्या वाटा ॥ गगन कैलासीं गोविल्या जटा ॥ त्यानें मेरूचा केला सोटा ॥ सप्त सागरचा केला घोटा ॥ मीनमार्गीं ॥ अनु. ॥ २ ॥ चवदा चक्रांची बांधीली मठी ॥ हातीं घेउनी ज्ञानतुंबडी ॥ चंद्र सूर्य दीप जोडी ॥ लाविली सिंगी ॥ अनु. ॥३॥ ऐसा तो सन्यासी निर्गुण ॥ निरालंब नीरांजन ॥ करीतो त्रिवेणीचें स्नान ॥ दिसतो भ्रमर गुंफेंतुन ॥ ऐसा तो योगी ॥ अनु. ॥४॥ ऐसा तो गोसावी भेटला ॥ पेला ब्रह्मींचा पाजिला ॥ रामदास तयाचा चेला ॥ युगान युगीं ॥ अनु० ॥ बावा. ॥ ५ ॥

## शकुंतला.

( चाल—चित्रकूट नग सोडुनि राघव ).

ऐक नृपा दुःष्यंत महिपती पुत्र इलीनाचा ॥ न्याय सांग वेदांत मिमांसा साठा शब्दांचा ॥ तो नृप एके दिवशीं गेला कण्व आश्रमाला ॥ पुसे कथा जन्मेजय

वैशंपायन वक्साला ॥ भारत ऐसें किमर्थ वदती आमचे पूर्वजाला ॥ पुसे कथा जन्मेजय वैशंपायन वक्साला ॥ १ ॥ पर्णकुटीं रमणीय मनुष्याविण गृह सामुग्री ॥ पाहुनि राजा गर्जुन बोले कवणचि अधिकारी ॥ शब्द ऐकितां दुहिता त्याची चित्र मानी चतुरी ॥ हंसगती लावण्यचंद्रिका आली बाहेरी ॥ दर्भासन देऊनि नृपातें प्रश्न करी चतुरी ॥ कवण तुह्मी ही वार्ता घाला मच्छ्रुतीच्या विपरी ॥ बहुत श्रहाणी पाहुनि भूपति संतोषें भरला ॥पुसे०॥भारथ०॥ पुसे०॥ २ ॥ ऐक मृगाक्षी पुरुवंशज मी राजा दुःष्यंत॥ श्रवणीं ऐकिला असेल जरी तरी ओळखी विख्यात॥ उर्ध्वरेत मी कण्व ऐकिला त्याचे उदरांत ॥ कशिग जन्मली कन्या मज हें सांग यथायुक्त ॥ ऐक नृपाळा येथचि आला एक मुनीनाथ ॥ तो मुनी पुसतां सर्व कथीयला कण्वें वृत्तांत ॥ तेच सांगतें तनमन द्यावें माझ्या कथनाला ॥ पुसे० ॥ ३ ॥ तिव्रतपातें करितां पाहुनी विश्वामित्रातें ॥ भिउनि सुरेशें तिथें धाडिली शिघ्र मेनिकेतें ॥ सवें घेउनी सुगंध मालती आली विपिनातें ॥ तीरीं वसनें सोडुनि उदकीं शिरली स्नानातें ॥ चीरकंचुकी उडोन गेली व्योमिगंधवातें ॥ धांउनी गाधीसुत आडवी तिज धरून ह्मणी

हातें॥सांडुनी जपतप साधन सर्वही तिचे गळीं पड-
ला॥पुसे०॥४॥ वहु सुरतेच्छा तृप्त करोनी सा
गुनी सुरललना॥ गाधिज गेला तपा अप्सरा गेली
सुरसदना॥ हिमालयावर होई प्रसूती सजितां या
रत्ना॥ शकुंत पक्षी करुनि साउली रक्षित मम
प्राणा॥ कण्व मुनी दर्भास पातला आली सा
करुणा॥ घेउनि गेला निजाश्रमीं मज पाळीयलें
जाणा॥शकुंतला मम नाम ठेविलें जन्मयोग कथिला॥
॥ पुसे०॥ भारथ०॥ पुसे०॥ ५॥ ऐकुनि राजा
मनीं विचारी सुरांगना जठरीं॥ जन्म पावली
ऋषिवीर्यें जे दुर्लभ ही नारी॥ विचार करुनी
नृपती बोले सुभगे अवधारी॥ फुल्ल कमलिनी तद-
गत रस हा हो तूं गुरुभ्रमरीं॥ पूर्वपुण्य रे फ-
लासि आलें भूपति वर झाला॥ पुसे०॥ भारथ०॥
॥ पुसे०॥ ६॥ कण्व तात ह्मणि येइल सातें मागुन
न्या नगरा॥ लग्न यथाविधि करुनि सुखातें भोगी
नृपकुमरा॥ भूप ह्मणे हें सत्य परी मज नाहीं धीर
जरा॥ दे सुख मजवर केला सखये पंचशरें मारा॥
अधिर नृपातें पाहुनि मग ह्मणे होइल सा कुमरा॥
द्याल राज्यपद तरी मृदु परी देईल हो धारा॥ मम
कर घे करि शफथ दीधलें पद तव तनुजाला॥पुसे०

॥भारथ०॥ पुसे० ॥ ७ ॥ सभाग्य नर एकांत स्वरूपें पाहुनि अनुसरली ॥ अक्षय भावें चतुर उभयतां सुरतसुखें रमलीं ॥ हेत पुरलीया नृपाति मानसीं ऋषिभी उद्भवली ॥ भोगुनि तिजला जाय नृपति तो कण्व माय आली ॥ शुष्क वदन तनु लज्जाकृतिनें तद्कृती जाणविली ॥ अभय वचन दे मुनिवर तेव्हां कन्या पदीं जडली ॥ नव मासां तीं उच्च ग्रहवली भरत सुता व्याली ॥ जन्मोत्साहा करी कण्व वेद सुसुखी हो तुं मुली ॥ नृपगुण मंडीत पंडीत पाहुनी मोद तया जाहला ॥ पुसे० ॥ भारथ ॥ पुसे० ॥८॥ उपनयनादिक ऋषी सर्व करी प्रेमें संस्कार ॥ पंचम वर्षें पंचानन मद करी झपी संहार ॥ प्रताप पाहुनी शिष्य मुनीसह कण्व तुकपवी शिर ॥ नेउनि दुष्यंतासा भेटवा शकुंतला कुमर ॥ आज्ञा घेउनि त्वरें निघाले शिष्य थोर थोर ॥ वंदन करऊनि सांगति मुनीही भार्या तव कुमर ॥ पुरू दुजा अवतरला या दे सर्व राज्य भार ॥ भरणांत भरथ हें नाम ठेऊनी नंदन पाठविला ॥ पुसे० ॥ भारथ०॥पुसे०॥ ॥९॥ जाणे परी प्रत्ययार्थ प्रभुनें नेणीव प्रगटविली॥ कैची भार्या कुमर कुणाचा ह्मणुनी हेळसली ॥ परस्परीं संवाद माजतां ह्मखोक्ती जाहली ॥ देई

दारा कुमर तुझा हा सोडुं नको बोली ॥ थरथरले जन दुष्यंतें निज अंकीं बैसविली ॥ विप्र मंडळी अशीस देउनी निजाश्रमीं गेली ॥ तद्वंशांतिल म्हणोनि बोलती भारत वंशाली ॥ भरथ जन्म ऐकतांचि मनीं धर कृतार्थ तनु झाली ॥ गोविंदाच्या कृपें कृष्ण हें पद्य खल्य वदला ॥पुसे॰॥भारथ॰॥ ॥ पुसे॰ ॥ १० ॥

## उद्धव.

चाल–( विटेवरी कमलनयन रुक्मिणीपती ).

उद्धवा आज गोकुळांत काय करावें ॥ हरिवीण दीन आम्ही कोणा स्मरावें ॥ ऐसे वाटतेंचि जहर खाउनि मरावें ॥ घडोघडीं दुःख फार होतसे जिवा॥ हरिवीण धीर धरवेनारे ऊद्धवा ॥ जावें मथुरेसि घेउनि यावें माधवा ॥ हरि॰ ॥ध्रु॰॥१॥ गृहिं काम धंदा आम्हां कांहीं सुचेना ॥ अन्नउदक जहर जसें कांहीं रुचेना ॥ आतां यदुराया तरी दाव लोचना ॥ दिवानिशीं चैन नाहीं आमचे जिवा ॥ हरिवीण॰ ॥ २ ॥ कुब्जा कुबडी कशी आवडली वरी ॥ तुला तिची ममता कशी लागली हरी ॥ निष्ठुर कसा जाहलासि आमुचेवरी ॥ रोड कशी गोड झाली

आतांरे माधवा ॥ तुलारे माधवा ॥ हरिवीण ॥३॥ उद्धवराज गोपिकेसीं गुरु भेटला ॥ देहि आहे देव म्हणुनी सत्य वाटला ॥ हरिचरणीं गोपिकांचा प्रेम दाटला ॥ निशीदिनीं चैन नाहीं हरी भेटवा ॥ कृष्ण भेटवा ॥ हरिवीण ॥ ४ ॥ दीन होउनि सुरवजपा गोपि गाजती ॥ वारंवार उद्धवाचे चरणीं लागती॥ कधीं भेटवील आम्हां सांग श्रीपती ॥ आतां यदु-राया भेटदान मागती ॥ आतां भेटवील सख्या हरीरे केधवा ॥ कृष्णा केधवा ॥ हरिवीण ॥ ५ ॥

## ८८.

चाल—( शैवालें युक्त. )

हरि माझें मूल बाई सकुमार सावळें ॥ मजवाटे दृष्ट झाली निज घेतां चावळे॥ धरवेना धीर कांहीं मन माझें कोंवळें ॥ आतां पंचाक्षरी कोणी कैसा तो पाहिना ॥ दृचकोनी ऊठतांची गोविंद राहि-ना ॥ १ ॥ कैलासीं जाणवीलें मग गिरिजापाल-का ॥ गजचर्म नीळकंठ गळां रुंडमालीका ॥ तात्काळ येउनीया ह्मणे दावा बालका ॥ ह्मणे यांचीं पंच तोंडें मूल माझें भीइल ॥ घाला गे यास कांहीं ह्मणजे हा जाइल ॥ हर म्हणे हरीवीण मन माझें राहिना ॥

दचकोनी ऊठतांची गो. ॥ २ ॥ येश्वदे वाई वेगें हारिलागे पाठवा ॥ दश आवतारांत माते मूल तुझा आठवा ॥ मग आली जननी ते हारिलागे घेउनी ॥ स्थीर केला माधवातें अंगारा लाउनी ॥ आतां वाधा नारासिंहा तुज कैची होईना ॥ दचको. ॥ ३ ॥ खरी झाली दृष्ट माझे श्रीहरिला वाटतें ॥ डायड-चकुन् लेकरूं हें तिनतिनदां ऊठतें॥भयभारी जिवा-कैसा मनिं भारी वाटतें ॥ किती धीर देऊं जीवा मन शांत होइना । रडतो हा हृषीकेशी बाळ माझा राहीना ॥ रडतो हा हृषीकेशी काय केल्या समजेना ॥ ४ ॥ रडतसे पाळण्यांत येई उतरून खालता ॥ जाई सोडी वासरांतें धरि पुछ चालता ॥ गोपाळा संगें वारे तूं होई बोलता ॥ हा धीट मोठा भारी वागूला भीईना ॥ रड. ॥ ५ ॥ नको नेवूं हरीला गे दुधभात भरवुंदे॥ फुलातुळसी देवापाशीं हा बाळ खेळुंदे ॥ कानफाट्या हातिशांती अंगारा लावुंदे ॥ नवसाचा जननीबाई ठाऊक होईना ॥ रडतो ॥ ६ ॥ रडतसे राहुन राहुन फार टाहो घेतला ॥ आंगणीं उखळातें बांधोनी घातला॥ नित्य कळतो समाचार कंसासी वर्तला ॥ देव कांहो अर्जुन यासी वरी बुद्धि देईना ॥ ७ ॥ धन्यदैव यशो-

देचें सुंदर हें बालक ॥ भक्तांचा साह्यकारी वैकुंठ नायक ॥ दुष्टांचा शत्रु हाची दीनांचा पालक ॥ महादेव गूण गातां मनशांती होईना ॥ रड. ॥ ८ ॥

## उखा.

शोणिताग पुरी । पुरीं बाणासुर ॥ सवे आसुरांचा भार ॥ कैलास शिखरीं भोळाशंकर ॥ तो स्तविला उमावर ॥ प्रसन्न झाला भोळाशंकर ॥ ह्मणे असुरा मागे वर॥असुर तो बोले । हरहर वाटतो भुजांचा भार॥ह्यास देई देई झुंजार ॥ होणार बुद्धि तदनुसार ॥ उखा. ॥ बो. एकां. ॥ सखेदा. ॥ उ. ॥ १ ॥ कोणे एके दिवशीं । दिवशीं बाणबाळी ॥ निघाली पूजा करकमळी ॥ पुजाया गौरी । गौरिसहित भोळा ॥ देखीला साऱ्यांचा मेळा ॥ मूर्छागत झाली । झालि राजबाळा ॥ कधीं पाहिन मदनपुतळा ॥ स्वस्थ होई ऊ । होईल माझें चित्त ।ऐसें उखा बोलत॥उखाबाई वाले॥बोले एकांत॥ सखे दाखवि रतीसुत ॥ उखा- वा. ॥ २ ॥ प्रसन्न झाली । झाली दाक्षा यणी ॥ सावध होई मृगनयनी॥ वर तुज घेई॥ वैशाख मासा शुद्धपक्ष द्वादशीस ॥ स्वप्नि येईल । येईल एक पुरुष ॥ तो तुज वर होईल सत्य॥ उ. ॥ बो. ॥

दचकोनी ऊठतांची गो. ॥ २ ॥ येश्वदे बाई वेगें हारिलागे पाठवा ॥ दश आवतारांत माते मूल तुझा आठवा ॥ मग आली जननी ते हारिलागे घेउनी ॥ स्थीर केला माधवातें अंगारा लाउनी ॥ आतां बाधा नारसिंहा तुज कैची होईना ॥ दचको. ॥ ३ ॥ खरी झाली दृष्ट माझे श्रीहरिला वाटतें ॥ डायड-चकुन् लेकरूं हें तिनतिनदां ऊठतें॥भयभारी जिवा-कैसा मनिं भारी वाटतें ॥ किती धीर देऊं जीवा मन शांत होइना । रडतो हा हृषीकेशी बाळ माझा राहीना ॥ रडतो हा हृषीकेशी काय केल्या समजेना ॥ ४ ॥ रडतसे पाळण्यांत येई उतरून खालता ॥ जाई सोडी वासरांतें धरि पुछ चालता ॥ गोपाळा संगें बारे तूं होई बोलता ॥ हा धीट मोठा भारी बागूला भीईना ॥ रड. ॥ ५ ॥ नको नेवूं हरीला गे दुधभात भरवुंदे॥ फुलातुळसी देवापाशीं हा बाळ खेळुंदे ॥ कानफाट्या हातिशांती अंगारा लावुंदे ॥ नवसाचा जननीबाई ठाऊक होईना ॥ रडतो ॥ ६ ॥ रडतसे राहुन राहुन फार टाहो घेतला ॥ आंगणीं उखळातें बांधोनी घातला॥ नित्य कळतो समाचार कंसासी वर्तला ॥ देव कांहो अजुन यासी बरी बुद्धि देईना ॥ ७ ॥ धन्यदैव यशो-

देचें सुंदर हें बालक ॥ भक्तांचा साह्यकारी वैकुंठ नायक ॥ दुष्टांचा शत्रु हाची दीनांचा पालक ॥ महादेव गूण गातां मनशांती होईना ॥ रड. ॥ ८ ॥

## उखा.

शोणिताग्र पुरी । पुरीं बाणासुर ॥ सर्व आसुरांचा भार ॥ कैलास शिखरीं भोळाशंकर ॥ तो स्तविला उमावर ॥ प्रसन्न झाला भोळाशंकर ॥ ह्मणे असुरा मागे वर॥असुर तो बोले । हरहर वाटतो भुजांचा भार॥ह्यास देई देई झुंजार ॥ होणार बुद्धि तदनुसार ॥ उखा. ॥ बो. एकां. ॥ सखेदा. ॥ उ. ॥ १ ॥ कोणे एके दिवशीं । दिवशीं बाणबाळी ॥ निघाली पूजा करकमळी ॥ पुजाया गौरी । गौरिसहित भोळा ॥ देखीला साऱ्यांचा मेळा ॥ मूर्छागत झाली । झालि राजबाळा ॥ कधीं पाहिन मदनपुतळा ॥ स्वस्थ हाई ऊ । होईल माझें चित्त ।ऐसें उखा बोलत॥उखाबाई बाले॥बोले एकांत ॥ सखे दाखवि रतीसुत ॥ उखा-बा. ॥ २ ॥ प्रसन्न झाली । झाली दाक्षायणी ॥ सावध होई मृगनयनी ॥ वर तुज घेई॥ वैशाख मासा शुद्धपक्ष द्वादशीस ॥ स्वप्नें येईल । येईल एक पुरुष ॥ तो तुज वर होईल सत्य ॥ उ. ॥ बो. ॥

सखेदा. ॥ उ. ॥ ३ ॥ उखामंदिर । मंदिर शृंगारून ॥ घाली अलंकारभूषण ॥ नेसुन पैठणी पैठणी मोलाची ॥ शोभते कन्या बाणाची॥ चोळि ल्याईली॥ ल्याईली तापसाची ॥ वरती जाळी मोतीयाची ॥ माळा शोभे शोभती चंद्रहार ॥ गगनीं लोपे दिनकर ॥ भाळीं शोभे । विजवरा चंद्रकोर ॥ मंचकीं पुष्पाचे हार ॥ स्वप्नि बोलते ॥ बोलत सुंदरा ॥ कोठे जाता प्राणेश्वरा॥ मला टाकुनी टाकुनी मंचकीं॥ ह्मणुनी अंग घालि क्षिती ॥ उ. ॥ बो. ॥ स. उ. ॥४॥ लिहिती चित्ररेखा भिंति घोटाळुन ॥ लिही ब्रह्मनंदन॥ सरस्वतीसहीत॥सहित गजवदन ॥काढीलें वैकुंठभुवन ॥ लक्षुमिसहीत । सहित नारायण ॥ लिहिलें सर्वहि त्रिभुवन ॥ मथुरापुरी द्वारका पट्टण॥ श्रीकृष्ण रुक्मिण ॥ काढीला प्रद्युम्न प्रद्युम्न कृष्णसुत ॥ लिहीलें स्वस्तचित्त ॥ उखावा. बो. ॥ ए. ॥ स. ॥ उ. ॥ ५॥ लिहिती चित्ररेखा ॥ भिंती घोटाळून॥ लिहिलें सर्वही त्रिभुवन॥ धन्य तिचि ख्याती॥ ख्याती काय वर्णु ॥ लिहिलें सर्वही संपूर्ण ॥ अपाद पद्में दैदिप्यमान ॥ कटी शोभे पीत वसन ॥ कंठीं शोभे । कौस्तुभमणी कंठीं ॥ सावळे सगूण जग जेठी ॥ पाहुनि उखा चरणीं घाली मिठी ॥ अनुरुद्ध

प्रद्युम्नाचे पोटीं ॥ उखाबा० ॥ स० ॥ ६ ॥ निघाली चित्ररेखा । शोणीतापुराहूनी ॥ अंतराळीं मार्ग क्रमुनी ॥वाटे उभा ब्रह्मानंदन॥वंदुनिया त्याचे चरण॥ द्वारकेभोंवतीं फिरे सुदर्शन॥त्यास घाली माझी आण॥ मोहनी घालोनी मंचक उचलीला ॥ आणिला शोणितापूर भुवनीं ॥ जागा झाला झाला मदन बाळ॥ उखा घाली त्यासी माळ ॥ उखा विनवी हरीचें पद कमळ ॥ परब्रह्म घाली माळ ॥ उखा आनंदें आनंदें चित्त ॥ सखे भेटला रतीसूत॥उखाबाई बोले बोले एकांत ॥ सखे भेटला रतीसूत ॥ उखाबा०॥७॥

## पद.

दृढ धरि मति हरिपायिं शरण जा ॥ धृ० ॥ मी मी ह्मणतां जन्महि गेला। काय लाभ तुज झालारे ॥ व्यर्थ भ्रमामध्यें पडुं नको सखया स्वार्थ सर्व हारविलारे॥ दृढ० ॥ १ ॥ कामामार्गें फिरशि रिकामा । सोडुन प्रभुचे नामारे॥बलरामानुज कामा येईल वद वद मंगल धामारे॥ धृ० ॥ २ ॥ विनंति ही रघुनाथ सुताची धरुनि मनामध्यें राहीरे ॥ मना प्रार्थना हेचि हरीच्या भजना करि लवलाहीरे ॥ ॥ दृढ धरि० ॥ ३ ॥

सखेदा. ॥ उ. ॥ ३ ॥ उखामंदिर । मंदिर शृंगा-
रून ॥ घाली अलंकारभूषण ॥ नेसुन पैठणी पैठणी
मोलाची ॥ शोभते कन्या बाणाची॥ चोळि ल्याईली॥
ल्याईली तापसाची ॥ वरती जाळी मोतीयाची ॥
माळा शोभे शोभती चंद्रहार ॥ गगनीं लोपे दिन-
कर ॥ भाळीं शोभे । बिजवरा चंद्रकोर ॥ मंचकीं
पुष्पाचे हार ॥ स्वप्नि बोलते ॥ बोलत सुंदरा ॥
कोठे जाता प्राणेश्वरा॥ मला टाकुनी टाकुनी मंचकीं॥
ह्मणुनी अंग घालि क्षितीं ॥ उ. ॥ बो. ॥ स.
उ. ॥४॥ लिहिती चित्ररेखा भिंति बोटालुन ॥ लिही
ब्रह्मनंदन॥ सरस्वतीसहीत॥सहित गजवदन ॥काढीलें
वैकुंठभुवन ॥ लक्षुमिसहीत । सहित नारायण ॥
लिहिलें सर्वहि त्रिभुवन ॥ मथुरापुरी द्वारका पट्टण॥
श्रीकृष्ण रुक्मिण ॥ काढीला प्रद्युम्न प्रद्युम्न कृष्ण-
सुत ॥ लिहीलें स्वस्तचित्त ॥ उखावा. बो. ॥ ए. ॥
स. ॥ उ. ॥ ५॥ लिहिती चित्ररेखा ॥ भिंती बोटा
लून॥ लिहिलें सर्वही त्रिभुवन॥ धन्य तिचि ख्याती॥
ख्याती काय वर्णु ॥ लिहिलें सर्वही संपूर्ण ॥
अपाद पद्में दैदिप्यमान ॥ कटी शोभे पीत वसन ॥
कंठीं शोभे । कौस्तुभमणी कंठीं ॥ सावळे सगूण जग
जेठी ॥ पाहुनि उखा चरणीं घाली मिठी ॥ अनुरुद्ध

प्रद्युम्नाचे पोटीं ॥ उखाबा० ॥ स० ॥ ६ ॥ निघाली चित्ररेखा । शोणीतापुराहूनी ॥ अंतराळी मार्ग क्रमुनी ॥बाटे उभा ब्रह्मानंदन॥वंदुनिया त्याचे चरण॥ द्वारकेभोंवतीं फिरे सुदर्शन॥त्यास घाली माझी आण॥ मोहनी घालोनी मंचक उचलीला ॥ आणिला शोणितापूर भुवनीं ॥ जागा झाला झाला मदन बाळ॥ उखा घाली त्यासी माळ ॥ उखा विनवी हरीचें पद कमळ ॥ परब्रह्म घाली माळ ॥ उखा आनंदें आनंदें चित्त ॥ सखे भेटला रतीसूत॥उखाबाई बोले बोले एकांत ॥सखे भेटला रतीसुत ॥ उखाबा०॥७॥

## पद.

दृढ धरि मति हरिपायिं शरण जा ॥धृ० ॥ मी मी ह्मणतां जन्महि गेला। काय लाभ तुज झालारे ॥ व्यर्थ भ्रमामध्यें पडुं नको सखया स्वार्थ सर्व हारविलारे॥ दृढ०॥ १॥ कामामार्गे फिरशि रिकामा । सोडुन प्रभुचे नामारे॥बलरामानुज कामा येईल वद वद मंगल धामारे॥ धृ०॥२॥ विनंति ही रघुनाथ सुताची धरुनि मनामध्यें राहीरे ॥ मना प्रार्थना हेचि हरीच्या भजना करि लवलाहीरे ॥
॥दृढ धारि० ॥ ३॥

## प्रार्थना.

(सुंदर मुख तुंदिल. या चालीवर.)

कुंददंत, मंदहास्य, नंदनंदना ॥ नंदकंद, हे मुकुंद, कंसकंदना ॥ धृ० ॥ नमितां तुज सर्व लया जाति यातना ॥ निगम असें गर्जतात हीच भावना ॥ धरुनि मनीं बुधजन तव करिती पूजना ॥ गाती, ध्याती, स्तविती, सकलपूर्ति, सगुणमूर्ति, रुचिरकीर्ति, हे दयाघना ॥ १ ॥ व्यसनवन्हि जाळितसे आमुच्या मना ॥ चिंतोदधि खवळुनि ने धुवुनि बलधना ॥ परवशतावायु हरी प्राणबंधना ॥ गेली, हरली, सरली, अस्मन्मति, सद्गुणतति, सकलनीतिं, काय या क्षणा ॥ २ ॥ गोपसख्या कोप टाक, पाहि नतजनां॥कोण तुझ्यावीण करिल पूर्ण कामना॥कृपादृष्टि सतत ठेवि ह्मणुनि याचना ॥ करितों, धरितों, स्मरतों, तवचरणा, हे करुणा, जलवरुणा, पतीतपावना ॥ ३ ॥

## पद अंबिकेचें.

( चाल पावना वामना० )

अंबिके, अंबिके, अंबिके, ग तूं पाव मला जगदंबिके ॥ मला० ॥ सेवा करितां भक्तालागी । वर

देई जगतपालिके ॥ गे तूं० ॥ १ ॥ शुक सनकादिक ध्याति तुला गे । हे माये जगचालिके ॥ गे तूं० ॥ २ ॥ जग हें व्यापुनि राहसि सदोदित । धरि अवतार तूं कालिके ॥ गे तूं० ॥ ३ ॥ शरण शरण हे शरण तुला मी । प्रसन्न हो शिवमोहिके ॥ गे तूं० ॥ ४ ॥ महिषासुर हा दैत्य मातला । या वधिसी तूं चंडिके ॥ गे तूं० ॥ ५ ॥ शुंभ निशुंभें देवां गांजियलें या सोडविलें तूं रेणुके ॥ गे तूं० ॥ ६ ॥

समाप्त.

म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव सुबोध गाणी



बडोदें,—“ पूर्णचंद्रोदय ” छापखाना.